DAILY THANEVAIBHAV RNI REGD NO. 27878/ 75, POSTAL NO. THC/186/2018-2021

कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, मीरा-भाईंदर, अंबरनाथ-बदलापूर, भिवंडी, उल्हासनगर, मुरबाड, शहापूर.

आतील पानांत

पाणी टंचाईला शिवसेनाच जबाबदार; नरेंद्र मेहता यांचा आरोप

शाळेच्या मालकी वादातून प्राणघातक हल्ल्याचा प्रयत्न

निर्बंध घटले, जबाबदारी वाढली!

अग्रलेख / 5

# ठाणेवैभव

www.thanevaibhav.in

ठाणे जिल्ह्याचे सर्वाधिक खपाचे परिपूर्ण दैनिक | इष्ट ते छापणार | संस्थापक : नरेन्द्र बल्लाळ




कल्याण-डोंबिवली वैभव विशेष

>>पान ५ वर

भारतीय सौर दिनांक कार्तिक २७ शके १९४४ | वर्ष ४७ | अंक ५३ | मंगळवार १९ ऑक्टोबर २०२१ | पाने ६ | रु. ४ | संपादक : मिलिन्द बल्लाळ

# कोरोनाची तिसरी लाटच काय, नवा व्हेरिअंटही येणार नाही!

## तज्ज्ञांनी दिली महत्त्वाची माहिती

**नवी दिल्ली: ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिना तिसऱ्या लाटेसाठी निर्णायक महिना ठरेल असं सांगितलं गेलं होतं. पण तिसऱ्या लाटे संदर्भातील एक दिलासादायक माहिती आता समोर आली आहे. कोरोना प्रादुर्भावाच्या आणखी एका लाटेची कोणतीही शक्यता सध्या दिसून येत नाही, असे काही वायरोलॉजिस्ट आणि डॉक्टरांनी म्हटले आहे.**



**आरोग्य आयुक्त रणदीप डी यांनी आपल्याला अजूनही खूप सतर्क राहण्याची गरज असल्याचं म्हटलं आहे. जोवर 100 टक्के लसीकरण होत नाही. तोवर कोविड प्रतिबंधन नियमांचं काटेकोर पालन करणं खूप गरजेचं असल्याचं ते म्हणाले. कर्नाटकमध्ये सध्या 80 टक्के जनतेला कोरोना विरोधी लसीचा पहिला डोस देण्यात आला आहे. तर 30 टक्के नागरिकांचं लसीकरण पूर्ण झालेलं आहे. राष्ट्रीय सरासरी आकडेवारीपेक्षाही हा आकडा चांगला आणि वाखणण्याजोगा आहे, असंही ते म्हणाले. याच दरम्यान ऑगस्टमध्ये एका सीरो सर्व्हेतून समोर आलेल्या माहितीत बंगलोरमध्ये 80 टक्के आणि संपूर्ण कर्नाटकमध्ये 65 टक्के नागरिकांमध्ये अँटिबॉडी विकसीत झाल्या आहेत. त्यामुळे तिसऱ्या लाटेचा धोका खूप कमी झाला आहे.**

तज्ज्ञांच्या मतानुसार ऑक्टोबरच्या मध्यापर्यंत जीनोम सिक्वेंसिंग आणि इतर अभ्यासातून समोर आलेल्या माहितीनुसार अद्याप व्हायरसच्या म्युटेशनचे कोणतेही संकेत मिळालेले नाहीत. याशिवाय विषाणुचा नवा व्हेरिअंटही समोर आलेला नाही. दरम्यान, सरकार आणि तज्ज्ञांनी फेब्रुवारी 2022 पर्यंत कोविड नियमांचं पूर्णपणे पालन करण्याचं आवाहन केलं आहे. कारण तोवर कोरोना विरोधी लसीकरणात देशाला मोठं यश आलेलं असेल आणि परिस्थिती खूप मोठ्या प्रमाणात सकारात्मक पद्धतीनं पाहायला मिळेल. सार्स कोव्ही-2चे जीनोम सिक्वेंसिंगचे नोडल अधिकारी डॉ. व्ही. रवी यांच्या मतानुसार कोरोनाचं संक्रमण डेल्टा व्हेरिअंटपर्यंत मर्यादित राहिलं आहे आणि ते आता कमी होताना दिसत आहे असं अभ्यासातून समोर आलं आहे. लसीकरणाचं प्रमाण वाढलं आहे आणि व्हायरसचा प्रभाव कमी झाला आहे. त्यामुळे व्हायरसच्या म्युटेशनचीही शक्यता आता कमी आहे.

>>पान ४ वर

## थोडक्यात

### संजय वढावकर यांची आंतरराष्ट्रीय ट्रेड युनियनवर निवड



**ठाणे:** हिंद मजदूर सभेचे महाराष्ट्र सरचिटणीस संजय वढावकर यांची "इंडस्ट्री ऑल ग्लोबल युनियन" या आंतरराष्ट्रीय ट्रेड युनियन संघटनेवर दक्षिण आशियातुन पॅसिफिक युनियन विभागातून, कार्यकारी मंडळात, 'कार्यकारी समिती सदस्य' म्हणून निवड करण्यात आली आहे.

जगातील 140 देश आणि 50 कोटी सभासद

>>पान ४ वर

### आधारवाडी कारागृहातील 20 कैद्यांना कोरोना

**कल्याण:** कल्याणच्या आधारवाडी कारागृहात शिक्षा भोगत असलेल्या कैद्यापैकी 20 कैदी कोरोना पोझीटीव्ह असल्याचे निदान झाले आहे. या सर्व कैद्यांना ठाणे सिव्हील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मात्र या कैद्यांना कोणतीही लक्षणे दिसत नसल्याचे कारागृह अधिक्षक सदाफुले यांनी सांगितले.

कोरोनाचा फैलाव सुरु होताच दाटीवाटीने भरलेल्या

>>पान ४ वर

### ठाण्यात कोरोनाचे ५४ नवीन रुग्ण

**ठाणे:** शहरातील कोरोना रुग्णवाढ किंचित कमी झाली आहे. आज 54 नवीन रुग्ण वाढले असून 67जण रोगमुक्त झाले आहेत. आज नऊ दिवसांनी एका रुग्णाचा मृत्यू झाला आहे.

महापालिका हद्दीतील कोरोना रुग्ण वाढ रोडावली आहे. सर्वात जास्त 16 रुग्ण वर्तकनगर प्रभाग समितीमध्ये आणि 13जण माजिवडे-मानपाडा प्रभाग समिती क्षेत्रात वाढले आहेत. 11 रुग्णांची भर उथळसर प्रभाग समिती येथे पडली आहे.

>>पान ४ वर

# ठामपात महापौर-राष्ट्रवादी शहर अध्यक्ष यांच्यात हमरी-तुमरी

## कोपरी-वागळेत राष्ट्रवादीची लसीकरण महोत्सवाची तयारी



**ठाणे:** कळव्यात लस महोत्सवाच्या ठिकाणी राष्ट्रवादीचे लावण्यात आलेले बॅनर फाडण्यात आल्यानंतर राष्ट्रवादी आणि शिवसेनेत संघर्ष पाहायला मिळत आहे. याचा जाब विचारत थेट पालकमंत्र्यांच्या मतदार संघातच स्वखर्चाने लसीकरण महोत्सव घेण्याची तयारी राष्ट्रवादीने दाखवली. त्यावेळी महापौर आणि राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांमध्ये चांगलीच खडाजंगी उडाली.

कळव्यात आयोजित करण्यात आलेल्या लसीकरण महोत्सवाच्या ठिकाणी आमदार जितेंद्र आव्हाड यांचे लावण्यात आलेले बॅनर्स फाडण्यात

>>पान ४ वर

उपाहारगृहे, दुकानांच्या वेळा वाढवण्याचा टास्क फोर्सच्या बैठकीत निर्णय

# अम्युझमेंट पार्कचे दरवाजे उघडणार

**मुंबई:** कोरोना रुग्णांच्या संख्येत घट होत असल्याने राज्यातील उपाहारगृहे, दुकानांच्या वेळा वाढविण्यासंदर्भात आज टास्क फोर्सच्या बैठकीत विचारविनिमय करण्यात आला. तसेच 22 ऑक्टोबरपासून चित्रपट आणि नाट्यगृहांसह अम्युझमेंट पार्कही सुरु करण्याचा निृणय घेण्यात आला आहे.

वर्षा येथे झालेल्या या बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे होते. यावेळी लहान मुलांच्या डॉक्टरांच्या टास्क फोर्सचे सदस्य देखील उपस्थित होते. अम्युझमेंट पार्क देखील 22 ऑक्टोबरपासून सुरु होतील, असे या बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

**ठाणे शहरात घोडबंदर भागात टिकुजिनीवाडी आणि सुरज वॉटर पार्क असून पावणे दोन वर्षांनी हे पार्क सुरु होणार आहेत. मुलांच्या मनोरंजनाचे मोठे माध्यम या निर्णयाने सुरु होणार असल्याने लहान-थोरांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे तर पार्क पालकांनाही दिलासा मिळणार आहे.**

अम्युझमेंट पार्कमधील मोकळ्या जागेत कोरड्या राईडसाठी परवानगी देण्याचे ठरले आहे. पाण्यातल्या राईडबाबत मात्र नंतर निर्णय घेण्यात येणार आहे.

कोविड व्यतिरिक्त डेंग्यू, चिकनगुनिया यांच्या रुग्णांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होत असून त्यांच्या उपचारांकडे देखील पुरेसे लक्ष द्यावे अशी सूचनाही मुख्यमंत्र्यांनी आजच्या बैठकीत केली. यावेळी बोलताना मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, आपण हळूहळू निर्बंध शिथील करीत असून रुग्णसंख्या कमी होताना दिसत आहे. 22 ऑक्टोबरपासून आपण चित्रपटगृहे, नाट्यगृहेही सुरु करीत आहोत. उपाहारगृहे व दुकाने यांच्या वेळा वाढवून देण्याची सातत्याने मागणी होत आहे. त्यामुळे त्यांच्या वेळा वाढविण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना तयार करण्याचे निर्देश दिले आहेत.

>>पान ४ वर

# कळवा-मुंब्रा भागात दूषित पाण्याचा पुरवठा

## विरोधी पक्षनेत्यांचा आयुक्त दालनाबाहेर ठिय्या

**ठाणे:** मागील काही दिवसांपासून कळवा-मुंब्रा भागात पाण्याची मोठ्या प्रमाणात टंचाई आहे. चार-चार दिवस पाणी गायब झालेले असतानाच दूषित पाण्याचा पुरवठाही मोठ्या प्रमाणात होत आहे. याबाबत अधिकाऱ्यांना सांगूनही कार्यवाही होत नसल्याने संतापलेल्या विरोधी पक्षनेते शानू पठाण यांनी दूषित पाण्यासह थेट पालिका आयुक्तांचे दालन गाठून ठिय्या आंदोलन केले.

तब्बल दोन तास चाललेल्या आंदोलनानंतर अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी दिलेल्या आश्वासनंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले. दरम्यान, ठाणे शहरासह राज्यभर शाळा सुरु झालेल्या असतानाही प्रत्यक्ष महासभा घेतली जात नाही. ठाणेकरांचे प्रश्न सभागृहात मांडले जाऊ नयेत, यासाठीच प्रत्यक्ष महासभा होत नसल्याचा आरोप करीत ठाणे पालिकेच्या महासभेतच कोरोना येतो का, असा सवालही यावेळी पठाण यांनी केला.

सध्या एमआयडीसीच्या वतीने जुन्या जलवाहीन्या बदलण्याचे काम सुरु आहे. परंतु ते सुरु असतांना वारंवार



जलवाहिनी फुटत असल्याने त्याचा परिणाम कळवा, मुंब्र्यातील नागरिकांना सहन करावा लागत आहे. या भागात पाण्याची समस्या तीव्र स्वरुपात निर्माण झाली आहे. याच पाण्याच्या मुद्यावरुन राज्याचे गृहनिर्माणमंत्री जितेंद्र आव्हाड यांनी देखील पाणी पुरवठा सुरळीत

>>पान ४ वर

**पाण्याच्या समस्येवर तोडगा निघत नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नसल्याचा इशारा त्यांनी यावेळी दिला. पाण्याची समस्या असतांना मुंब्रात जे पाणी सोडले जात आहे, ते देखील गढूळ स्वरुपात येत असल्याने तेच गढूळ पाणी घेऊन त्यांनी ठिय्या मांडला होता. अखेर अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी आणि पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता विनोद पवार यांनी पठाण यांची मनधरणी केली. त्यानुसार पाण्याचा दाब वाढविण्याबरोबर येथील टाकीची समस्या सोडवली जाईल असे आश्वासन दिल्यानंतर त्यांनी आंदोलन मागे घेतले.**

व्होल्टासचे कोविड सेंटर गंजलेले

# तात्पुरत्या शेडसाठी ६३ लाखांची उधळपट्टी; प्रस्ताव गुपचूप मंजूर

## भाजपा महिला आघाडी आक्रमक



**ठाणे :** ठाण्यातील व्होल्टास कंपनीच्या ग्राऊंडवर सिडकोच्या तिजोरीतले 16 कोटी रुपये खर्च करून महापालिकेने कोविड सेंटर बांधले. आजवर या केंद्रात एकाही कोरोना रुग्णावर उपचार झालेला नाही. आता कोट्यवधी रुपये खर्च करुन बांधलेले हे केंद्र गंजलेले असून तिथल्या अँगल्सला लागलेला गंज खाली पडत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. ती गळती थांबविण्यासाठी 63 लाख रुपये खर्च करून या केंद्रावर तात्पुरते शेड उभारणीचा प्रस्ताव सत्ताधाऱ्यांनी चोरीछूपे मंजूर केला आहे.

सदोष पद्धतीने केंद्राची उभारणी करण्याऱ्या ठेकेदार आणि त्याची पाठराखण करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याऐवजी त्याच्या चुकांवर पांघरुन घालण्याचा खटाटोप कशासाठी, हा कंत्राटदार पालिकेचा जावई आहे का, असे प्रश्न भाजपच्या महिला आघाडीच्या अध्यक्षा आणि नगरसेविका मृणाल पेंडसे यांनी उपस्थित केला आहेत.

**व्होल्टास कंपनीच्या आवारातील ज्या शेडमध्ये हे केंद्र उभारले आहे ती शेड 40 ते 50 वर्षे जूनी असून जीर्ण झालेली आहे. उन्हाळ्यात त्याला तडे गेले होते. या ठिकाणच्या अँगल्सला लागलेला गंज खाली पडत होता. तसेच, पत्रा तापल्याने कोविड केंद्रात गरम वाफाही येत होत्या. त्यामुळे या केंद्रात तात्पुरत्या स्वरुपातील शेड उभारणी अत्यावश्यक असल्याचे सांगत प्रशासनाने 63 लाख रुपये खर्चाचा प्रस्ताव तयार केला होता.**

कोरोनाचे संक्रमण वाढत असताना शहरात कोविड सेंटर्सची गरज होती. ठाण्यातील ग्लोबल इम्पॅक्ट हब, पार्किंग प्लाझासह कळवा, खारेगाव, कौसा येथे पालिकेने ही कोविड सेंटर्स उभारली होती. तिथे अनेक कोरोना रुग्णांवर यशस्वी उपचार करण्यात पालिका प्रशासनाला यश आले.

>>पान ४ वर

# मांडीवर थापले जाते समोशाचे पीठ; व्हिडियो झाला व्हायरल

**कल्याण:** कल्याण पूर्वेत एका ठिकाणी अतिशय घाणेरड्या पद्धतीने, स्वच्छता धाब्यावर बसवत समोसे तयार केले जात असल्याचे समोर आले आहे. कल्याण पूर्वेतील काटेमानिवली परिसरातील शंकर हॉटेलमध्ये चक्क समोसाचे पीठ घामाने माखलेल्या मांडीवर मारले आणि थापले जात असल्याचा धक्कादायक व्हिडिओ समोर आला आहे.

हा व्हिडिओ पाहिल्यानंतर विक्रेते स्वच्छतेशी प्रतारणा करत नागरिकांच्या आरोग्याशी खेळ खेळत असल्याचे वास्तव समोर आले आहे. हा व्हिडिओ पाहताच नागरिकांनी संताप आणि घृणा व्यक्त केली आहे.

रविवारी मराठी एकीकरण समिती, महाराष्ट्र राज्य यांची वार्षिक बैठक ही कल्याण पूर्व येथील काटेमानिवली येथे आयोजित करण्यात



आलेली होती. या बैठकीनंतर जमलेल्या सदस्यांना अल्पोपहार म्हणून समोसा देण्यासाठी मराठी एकीकरण समितीचे कल्याण शहर समनव्यक हे काटेमानिवली येथील शंकर हॉटेल ह्यांना समोस्याची ऑर्डर देण्यासाठी गेले होते. पण

### काटेमानिवली परिसरातील प्रकार

हॉटेलमधील संबंधित कामगार हे समोसा बनवण्यासाठी लागणाऱ्या पुऱ्या ह्या लाटून दुसऱ्या कामगाराच्या घामाने माखलेल्या मांडीवर ठेवत असतांना गलिच्छ चित्र हे भूषण पवार ह्यांच्या लक्षात आले. त्यांनी तातडीने सांगितलेली समोस्याची ऑर्डर रद्द करून संबंधित किळसवाण्या प्रकरणाचे चित्रीकरण केले आणि संबंधित प्रकरणाला वाचा फोडण्यासाठी सदर चित्रीकरण हे सामाजिक माध्यमातून लोकांपर्यंत पोहचवले.

जर अशा प्रकारे खाद्यपदार्थ पध्दतीने बनवून लोकांच्या आरोग्याशी संबंधित हॉटेल चालक खेळत असतील तर अशा हॉटेल चालकांकडे खाद्य परवाना कसा आला? खाद्य परवाना नसेल

>>पान ४ वर

# रामभाऊ तायडे दलित पँथरच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी

**ठाणे:** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाचा राजीनामा देणारे ठाण्यातील रामभाऊ तायडे यांची दलित पँथरच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड करण्यात आली.



दलित पँथरच्या नेत्या आणि नामदेव ढसाळ यांच्या पत्नी मल्लिका ढसाळ यांनी पत्रकार परिषदेत ही निवड जाहीर केली. मुंबई मराठी पत्रकार संघात ही पत्रकार परिषद झाली. यावेळी मोठ्या प्रमाणात दलित पँथरचे पदाधिकारी उपस्थित होते.

रामभाऊ तायडे हे आठवले यांच्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ठाणे शहर जिल्हाध्यक्ष पदाची धुरा सांभाळत होते. त्यांनी नुकताच दोन दिवसांपूर्वी अध्यक्ष पदाचा राजीनामा दिला होता. त्यानंतर ते कोणत्या

>>पान ४ वर

# एक पडदा चित्रपटगृहांच्या समस्यांवर योग्य तोडगा काढणार- मुख्यमंत्री

**मुंबई:** राज्यातील चित्रपटगृहांनी अग्नी, स्थापत्यविषयक अशा योग्य त्या सुरक्षा तपासण्या करुन चित्रपटगृहे सुरु करावीत असे आज मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सांगितले. 22 ऑक्टोबरपासून चित्रपटगृहे सुरु होत आहेत, त्या पार्श्वभूमीवर सिनेमा ओनर्स एन्ड एक्झिबिटर्स असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी आज सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्र्यांची भेट घेतली त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. आर्थिक कोंडीत सापडलेल्या एक पडदा चित्रपटगृहाना कसा दिलासा देता येईल यासाठी योग्य तो तोडगा वित्त विभागाच्या समन्वयाने काढण्यात येईल असेही ते म्हणाले.

यावेळी खासदार , ज्येष्ठ नेते शरद पवार, उपमुख्यमंत्री अजित पवार, परिवहन मंत्री अनिल परब, गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, पर्यावरण मंत्री



आदित्य ठाकरे, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव आशिष कुमार सिंह, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, पोलीस महासंचालक संजय पांडे आदींची उपस्थिती होती .

विविध परवान्यांचे नूतनीकरणासाठी राज्य शासनाने सवलत द्यावी तसेच सिनेमा लायसेन्सचे विनामूल्य नूतनीकरण करून द्यावे, जीएसटी भरल्यानंतर प्रत्येक तिकीटामागे 25 रुपये सर्व्हिस चार्जेस आकारण्यास परवानगी द्यावी , विद्युत वापर नसल्याने देयके मिनिमम वापरावर आधारित असू नये, मिळकत कर आकारु नये, अशा मागण्या करण्यात आल्या.

असोसिएशनच्या वतीने नितीन दातार, निमेश सोमय्या, पूना एक्झिबिटर असोसिएशनचे सदानंद मोहोळ, अशोक मोहोळ, प्रकाश चाफळकर यांनी आपल्या मागण्या सादर केल्या.




प्रसिद्धीच्या झोतात न आलेल्या पण सुप्रसिद्ध समाजसेवीपेक्षा कणभरही कमी नसलेल्या, तुमच्या आमच्यासारख्या पन्नास ज्येष्ठ नागरिकांच्या, ठाणेवैभव दैनिकाने नियमित प्रसिद्ध केलेल्या मुलाखतींचे संकलन असलेले सेकंड इनिंग हे स्फूर्तिदायक पुस्तक शारदा प्रकाशनने नुकतेच प्रकाशित केले आहे.

प्रकाशक श्री. संतोष राणे

लेखिका श्रीमती कुमुदिनी नरेन्द्र बल्लाळ

ठाणेवैभव कार्यालयात उपलब्ध

## ठाणे महानगरपालिका, ठाणे

महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिकेच्या मा.सर्वसाधारण सभेची सूचना
सभा सूचना क्रमांक ०७ दिनांक १२/१०/२०२१ बाबत पुरक घोषणा

प्रति,
सन्मा.श्री/श्रीमती---------------------------,
सदस्य/सदस्या,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

या सूचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, ठाणे महानगरपालिकेची मा.सर्वसाधारण सभा बुधवार दि.२०/१०/२०२१ रोजी सकाळी ठिक ११.३० वाजता, सभा सूचना क्रमांक ०७ दि.१२/१०/२०२१ रोजींच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचारविनिमय करण्याकरिता वेबीनार (Webinar) वर आयोजित करण्यांत आलेली आहे.

सदर सभेत सन्मा.सदस्यांच्या खालील प्रस्तावांच्या सूचनांवर विचारविनिमय करण्यांत येईल अशी पूरक घोषणा याद्वारे करण्यांत येत आहे.

तरी सदर सभेस आपण कृपया उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.महापौर सो., यांचे मान्यतेने .. .. ..

**सही/-**
(अशोक बुरपल्ले )
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

सभा सूचना क्रमांक ०७ दिनांक १२/१०/२०२१ बाबत पूरकघोषणा
सन्मा.सदस्यांकडील लेखी प्रस्तावाच्या सूचना

| | |
|---|---|
| प्रस्तावाची सूचना क्रमांक :१ | सन्मा.सदस्या सौ.राधिका राजेंद्र फाटक यांनी दिनांक २०.०९.२०२१ रोजींच्या पत्रान्वये लेखी स्वरुपात दिलेली प्रस्तावाची सूचना.<br>विषय : " दलित वस्ती निधी " अंतर्गत विकास कामात निधी उपलब्ध करुन देणे बाबत.<br>१. प्रभाग क्रमांक ७ क मधील भिमनगर येथील पंचशिल चाळ व आजूबाजूच्या चाळीलगत गटार व पायवाटा करणे बाबत. |
| प्रस्तावाची सूचना क्रमांक :२ | सन्मा.सदस्या श्रीमती विमल अर्जुन भोईर यांनी दिनांक २३.०९.२०२१ रोजींच्या पत्रान्वये लेखी स्वरुपात दिलेली प्रस्तावाची सूचना.<br>विषय ः आगामी मा.सर्वसाधारण सभेत " लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरि दलित वस्ती योजना" मधून प्र.क्र.०७/अ मधील विविध स्थापत्य कामाची प्रस्तावांची सूचना देणे बाबत.<br>१. भिमनगर येथील यादव यांच्या घराजवळील परिसरात गटार व पायवाटा करणे.<br>२. भिमनगर येथील बालवाडी परिसरात गटार व पायवाटा करणे.<br>३. भिमनगर येथील ग्लॉस्को कंपाऊंड शौचालय परिसरात गटार व पायवाटा करणे.<br>४. भिमनगर येथील लोखंडे यांच्या घराजवळील परिसरात गटार व पायवाटा करणे.<br>५. भिमनगर येथील गणेश गल्ली परिसरात परिसरात गटार व पायवाटा करणे.<br>६. भिमनगर येथील राम मारुती चाळ परिसरात गटार व पायवाटा करणे.<br>७. भिमनगर येथील डॉ.यादव जवळील परिसरात गटार व पायवाटा करणे.<br>८. भिमनगर येथील श्रीराम जनरल स्टोअर्सपरिसरात गटार व पायवाटा करणे.<br>९. भिमनगर येथील कांबळे यांच्या परिसरात गटार व पायवाटा करणे.<br>१०.भिमनगर येथील जाधव यांच्या घराजवळील परिसरात गटार व पायवाटा करणे.<br>११.भिमनगर म्हाडा येथील सूद यांच्या घराजवळील परिसरात गटार व पायवाटा करणे.<br>१२.भिमनगर येथील तिडके यांच्या घराजवळील परिसरात गटार व पायवाटा करणे.<br>१३.भिमनगर येथील विविध ठिकाणच्या परिसरात गटार व पायवाटा करणे. |
| प्रस्तावाची सूचना क्रमांक :३ | सन्मा.सदस्या श्रीमती वनिता संदिप घोगरे यांनी दिनांक २३.०९.२०२१ रोजींच्या पत्रान्वये लेखी स्वरुपात दिलेली प्रस्तावाची सूचना.<br>विषय : " लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरि वस्ती "या निधी अंतर्गत खालील प्रमाणे कामे करणे बाबत<br>१. परेरा नगर येथील लक्ष्मण पवार यांच्या घरापासून अमर इंगळे यांच्या घरापर्यंत गटार पायवाटा करणे.<br>२. परेरा नगर येथील छाया वाघमारे यांच्या घर परिसरात नविन पध्दतीने गटार पायवाटा करणे.<br>३. लोकमान्य पाडा नं.३ येथील अशोक निवास यांच्या घरापासून आत्माराम पाडमुख यांच्या घरापर्यंत गटार पायवाटा करणे.<br>४. चंद्र मणी बुध्द विहार परिसरात नविन गटार पायवाटा करणे.<br>५. गणेश मंदिर परिसरात नविन पध्दतीने गटार पायवाटा करणे.<br>६. गणेश नगर येथील श्रीविष्णू यांच्या घरापासून ते राजेश पवार यांच्या घरापर्यंत नविन गटार पायवाटा करणे.<br>७. गणेश नगर येथील लोकमान्य किराणा स्टोअर ते सदानंद मरले यावे नविन गटार पायवाटा करणे.<br>८. महालक्ष्मी मित्र मंडळ पाडा नं.३ परिवारातील चेतन धुरी ते अशोक गुप्ता यांच्या घरापर्यंत नविन गटार पायवाटा करणे.<br>९. गणेश कृपा चाळ ते दर्शन निवास नविन गटार पायवाटा करणे.<br>१०. ठाकूर चाळ ते टावरे चाळ नविन गटार पायवाटा करणे. |
| प्रस्तावाची सूचना क्रमांक: ४ | सन्मा.सदस्य सौ.राधिका राजेंद्र फाटक यांनी दिनांक २४.०९.२०२१ रोजींच्या पत्रान्वये लेखी स्वरुपात दिलेली प्रस्तावाची सूचना.<br>विषय : प्रभाग क्रमांक ७ मधील विविध स्थापत्य कामे " दलित वस्ती सुधारणा निधी " अंतर्गत कामाची निवड व निश्चिती करणे बाबत.<br>१. प्रभाग क्रमांक ७ (क) मध्ये बबलू महाजन घरापासून ते सुदिप भोपाळ कांबळे यांच्या घरापर्यंतच्या परिसरात गटार पायवाटा करणे.<br>२. प्रभाग क्रमांक ७ (क) मध्ये बाळकृष्ण नामदेव गोडांबे यांचे घरापासून ते राहूल लालताप्रसाद कश्यप यांच्या घरापर्यंतच्या परिसरात गटार पायवाटा करणे.<br>३. प्रभाग क्रमांक ७ (क) मध्ये प्रभाकर दुबे यांच्या घरापासून ते असिफ शेख यांच्या घरापर्यंतच्या परिसरात गटार पायवाटा करणे.<br>४. प्रभाग क्रमांक ७ (क) मध्ये आशाम शेख यांच्या घरापासून ते भिमराव थोंबरे यांच्या घरापर्यंतच्या परिसरात गटार पायवाटा करणे.<br>५. प्रभाग क्रमांक ७ (क) मध्ये रतनलाल सोमा पवार यांच्या घरापासून ते सोहनलाल कनोजिया यांच्या दुकानापर्यंतच्या परिसरात गटार पायवाटा करणे.<br>६. प्रभाग क्रमांक ७ (क) मध्ये महेश खैरे यांच्या घरापासून ते पांडे यांच्या घरापर्यंतच्या परिसरात गटार पायवाटा करणे.<br>७. प्रभाग क्रमांक ७ (क) मध्ये सचिन इंगळे यांच्या घरापासून ते सतिश सुर्यवंशी यांच्या घरापर्यंतच्या परिसरात गटार पायवाटा करणे.<br>८. प्रभाग क्रमांक ७ (क) मध्ये जीवन रॉड्रीग्ज यांच्या घरापासून ते आरती जनरल स्टोअर्स पर्यंतच्या परिसरात गटार पायवाटा करणे.<br>९. प्रभाग क्रमांक ७ (क) मध्ये अर्चना परब यांच्या घरापासून ते विठ्ठल लक्ष्मण जाधव यांच्या घरापर्यंतच्या परिसरात गटार पायवाटा करणे.<br>१०. प्रभाग क्रमांक ७ (क) मधील भिमनगर येथील बौध्द विहार परिसरात गटार पायवाटा करणे.<br>११. प्रभाग क्रमांक ७ (क) मधील चिरागनगर येथे शंकर मंदिराच्या बाजूला परिसरात गटार पायवाटा करणे.<br>१२. प्रभाग क्रमांक ७ (क) मधील चिरागनगर येथे वसईकर चाळीच्या मैदानाच्या बाजूला गटार पायवाटा करणे.<br>१३. प्रभाग क्रमांक ७ (क) मधील चिराग नगर येथे जे.के. ग्रामच्या बाजूला गटार व फूटपाथ करणे.<br>१४. प्रभाग क्रमांक ७ (क) मधील चिराग नगर येथे सन्नी बौध्द विहार परिसरात गटार व पायवाटा करणे. |
| प्रस्तावाची सूचना क्रमांक: ५ | ॲड. अनिता सुनिल गौरी यांनी दिनांक ५.१०.२०२१ अन्वये लेखी स्वरुपात दिलेली प्रस्तावाची सूचना.<br>विषय : खारीगांव पारसिकनगर सेक्टर ८ मधील सिवरेज वॉटर ट्रिटमेंट प्लांट शेजारील आरक्षित भूखंडावर भाजी मार्केट व पार्किंग प्लाझा बांधणेबाबत. |
| प्रस्तावाची सूचना क्रमांक :६ | सन्मा.सदस्या सौ.राधीका राजेंद्र फाटक यांनी दिनांक ५.१०.२०२१ रोजींच्या पत्रान्वये लेखी स्वरुपात दिलेली प्रस्तावाची सूचना.<br>विषय : "लोकशाहीर अण्णभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा" या लेखाशिर्षातर्गत प्र.क्र.०७(क) भिमनगर येथील विविध परिसरामध्ये करावयाची कामे.<br>१. प्र.क्र.७ (क) मधील भिमनगर येथील कोकाटे चाळ परिसरातील रामदास जमादार यांच्या घराजवळ गटार व पायवाटा करणे.<br>२. प्र.क्र.७ (क) मधील भिमनगर परिसरात पाखरे चाळ येथे गटार व पायवाटा करणे.<br>३. प्र.क्र.७(क) मधील भिमनगर येथील गणपती मंदिर परिसरातील शुभनारायण शर्मा ते पांडूरंग सखाराम सकपाळ यांच्या घराजवळ गटार व पायवाट करणे.<br>४. प्र.क्र.७ (क) मधील भिमनगर येथील गणेश गल्ली परिसरातील शेष निजाम ते कैलास बर्वे यांच्या घराजवळ गटार व पायवाट करणे. |
| प्रस्तावाची सूचना क्रमांकः ७ | सन्मा.सदस्य श्री.संजय संतू वाघुले यांनी दिनांक ७.१०.२०२१ रोजींच्या पत्रान्वये लेखी स्वरुपात दिलेली प्रस्तावाची सूचना.<br>विषय ः अंतिम भूखंड क्रमांक २४६ वरील ओपन स्पेस आरक्षणाचे जागेवर नाना नानी पार्क बनविणे बाबत. |
| प्रस्तावाची सूचना क्रमांक ः८ | सन्मा.सदस्य श्री.भुषण देवराम भोईर यांनी दिनांक ८.१०.२०२१ रोजींच्या पत्रान्वये लेखी स्वरुपात दिलेली प्रस्तावाची सूचना.<br>विषय ः "लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा" लेखा शिर्षांतर्गत प्र.क्र.३ (ड) अशोक नगर येथे विविध परिसरात गटार व पायवाटांची कामे करणे बाबत.<br>१. माजीवडा मानपाडा प्रभाग समिती क्षेत्रामधील प्र.क्र.३(ड) मधील अशोकनगर येथील आनंद केसरे यांचे घरापासून ते गोविंद माने यांचे घरापर्यंत गटार व पायवाट करणे.<br>२. माजीवडा मानपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्र.क्र.३(ड) मधील अशोक नगर येथील शिवाजी येसले यांचे घरापासून ते प्रत्यक्ष यादव घरापर्यंत गटार व पायवाट करणे.<br>३. माजीवडा मानपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्र.क्र.३(ड) मधील अशोक नगर येथील रविंद्र मिस्त्री यांचे घरापासून ते उतेकर यांचे घरापर्यंत गटार व पायवाटा करणे. |
| प्रस्तावाची सूचना क्रमांक ः ९ | सन्मा.सदस्य श्री.माणिक बाबू पाटील यांनी दिनांक ११.१०.२०२१ रोजींच्या पत्रान्वये लेखी स्वरुपात दिलेली प्रस्तावाची सूचना.<br>विषय ः लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरि दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत सन २०२१-२२ मध्ये नागरि सुविधांची कामे करणेसाठी अनुदान प्राप्त करुन देणे बाबत.<br>१. वा.प्र.स.अंतर्गत प्र.क्र.१६ ड शांतीनगर येथील निशाद अहमद यांच्या घराच्या परिसरात गटार व पायवाट करणे.<br>२. वा.प्र.स.अंतर्गत प्र.क्र.१६ ड शांतीनगर येथील संतोष कनोजिया यांच्या घराच्या परिसरात गटार व पायवाट करणे.<br>३. वा.प्र.स.अंतर्गत प्र.क्र.१६ ड शांतीनगर येथील सचिन पवार यांच्या घराच्या परिसरात गटार व पायवाट करणे.<br>४. वा.प्र.स.अंतर्गत प्र.क्र.१६ ड शांतीनगर येथील खुरसिद शहा यांच्या घराच्या परिसरात गटार व पायवाट करणे.<br>५. वा.प्र.स.अंतर्गत प्र.क्र.१६ ड शांतीनगर येथील उनी नायर यांच्या घराच्या परिसरात गटार व पायवाट करणे.<br>६. वा.प्र.स.अंतर्गत प्र.क्र.१६ ड शांतीनगर येथील गणेशकृपा सोसायटी परिसरात गटार व पायवाट करणे.<br>७. वा.प्र.स.अंतर्गत प्र.क्र.१६ ड शांतीनगर येथील नेहा संजीव अपार्टमेंट परिसरात गटार व पायवाट करणे.<br>८. वा.प्र.स.अंतर्गत प्र.क्र.१६ ड शांतीनगर येथील राधा भवन परिसरात गटार व पायवाट करणे.<br>९. वा.प्र.स.अंतर्गत प्र.क्र.१६ ड शांतीनगर येथील सद्गुरु सोसायटी परिसरात गटार व पायवाट करणे. |
| प्रस्तावाची सूचना क्रमांक ः१० | सन्मा.सदस्य श्री.राजेंद्र रमेश साप्ते यांनी दिनांक १४.१०.२०२१ रोजींच्या पत्रान्वये लेखी स्वरुपात दिलेली प्रस्तावाची सूचना.<br>विषय ः खारेगांव रेल्वे फाटक येथे सद्या अस्तित्वात असलेल्या रस्त्याच्या जागेवर भुयारी मार्ग तयार करणे बाबत. |
| प्रस्तावाची सूचना क्रमांकः११ | सन्मा.सदस्य श्री.गुरमुख सिंग बि.स्यान यांनी दिनांक १४.९.२०२१ रोजींच्या पत्रान्वये लेखी स्वरुपात दिलेली प्रस्तावाची सूचना.<br>विषय ः लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वसती सुधारणा योजनेअंतर्गत विविध कामे करणे बाबत.<br>१. वारलीपाडा येथील लालमती यादव यांच्या घरापासून ते पिंटू गौडा यांच्या घरापर्यंत गटार व पायवाट करणे.<br>२. वारलीपाडा येथील गणेश गल्ली नं.१ येथे गटार व पायवाट करणे.<br>३. वारलीपाडा येथील इमॉन्युएल चर्च परिसरात गटार व पायवाट करणे.<br>४. वारलीपाडा येथील शरद पवार यांच्या घरापासून ते सुनिल पडयार यांच्या घरापर्यंत गटार व पायवाट करणे.<br>५. वारलीपाडा येथील अनिल गवारे यांच्या घरापासून ते लाली यादव यांच्या घरापर्यंत गटार व पायवाट करणे. |
| प्रस्तावाची सूचना क्रमांकः१२ | सन्मा.सदस्य श्री.गणेश मल्लिकार्जुन कांबळे यांनी दिनांक १४.१०.२०२१ रोजींच्या पत्रान्वये लेखी स्वरुपात दिलेली प्रस्तावाची सूचना.<br>विषय ः लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत सन २०२१-२२ मध्ये नागरी सुविधांचे काम करण्यासाठी अनुदान प्राप्त करुन घेणेबाबत.<br>१. महात्मा फुलेनगर मधील ठामपा शाळा गल्ली नं.६ महाराज तिवारी यांच्या घरापासून ते राधेश्याम शर्मा यांच्या घरापर्यंत गटार व पायवाट करणे.<br>२. महात्मा फुले नगर मधील गल्ली नं.१० कुसूम संतोष ठाकूर यांच्या घरापासून ते चंदा बांगर यांच्या घरापर्यंत गटार व पायवाट करणे.<br>३. महात्मा फुलेनगर मधील गल्ली नं.२५ शिवकुमारी यादव यांच्या घरापासून ते उषा नारायण सावंत यांच्या घरापर्यंत गटार व पायवाट करणे.<br>४. महात्मा फुलेनगर मधील गल्ली नं.२० योगेश कनोजिया यांच्या घरापासून ते नरसिंह पिल्ले यांच्या घरापर्यंत गटार व पायवाट करणे.<br>५. महात्मा फुलेनगर मधील गल्ली नं.२१ इब्राहिम खान यांच्या घरापासून ते राजकिशोर ठाकूर यांच्या घरापर्यंत गटार व पायवाट करणे.<br>६. महात्मा फुलेनगर मधील गल्ली नं.१ इम्तियाज शेख यांच्या घरापासून ते दर्शनदेवी विश्वकर्मा यांच्या घरापर्यंत गटार व पायवाट करणे.<br>७. महात्मा फुलेनगर मधील गल्ली नं.३ दिनेश यादव यांच्या घरापासून ते मनिष तिवारी यांच्या घरापर्यंत गटार व पायवाट करणे.<br>८. महात्मा फुलेनगर मधील गल्ली नं.५राजेश कांबळे यांच्या घरापासून ते मुन्ना यादव यांच्या घरापर्यंत गटार व पायवाट करणे.<br>९. महात्मा फुलेनगर मधील गल्ली नं.७ वसंत मोरे यांच्या घरापासून ते समीर पटेल यांच्या घरापर्यंत गटार व पायवाट करणे.<br>१०. महात्मा फुलेनगर मधील गल्ली नं.९ उमाशंकर शर्मा यांच्या घरापासून ते राजेंद्र तिवारी यांच्या घरापर्यंत गटार व पायवाट करणे. |
| प्रस्तावाची सूचना क्रमांकः १३ | सन्मा.सदस्य श्री.अशरफ शानू पठाण यांनी दिनांक १४.१०.२०२१ रोजींच्या पत्रान्वये लेखी स्वरुपात दिलेली प्रस्तावाची सूचना.<br>विषय ः लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत सन २०२१-२२ मध्ये निधी उपलब्ध करुन खालील नागरी सुविधांची कामे करणे बाबत.<br>१. प्र.क्र.३२ मधील शिवाजीनगर पप्पू भाई चाळ परिसरात गटार व पायवाट करणे.<br>२. प्र.क्र.३२ मधील रईस बाग रोड आयेशा मंझिल परिसरात गटार व पायवाट करणे.<br>३. प्र.क्र.३२ मधील आझाद नगर परिसरात गटार व पायवाट करणे.<br>४. प्र.क्र.३२ मधील हाजी मलंग बिल्डींग परिसरात गटार व पायवाट करणे.<br>५. प्र.क्र.३२ मधील शिवाजीनगर गमई यादव चाळ परिसरात गटार व पायवाट करणे.<br>६. प्र.क्र.३२ मधील शिवाजीनगर दुर्गामाता मंदिर परिसरात गटार व पायवाट करणे.<br>७. प्र.क्र.३२ मधील सोनाजीनगर ज्ञानेश्वर भगत चाळ परिसरात गटार व पायवाट करणे.<br>८. प्र.क्र.३२ मधील सोनाजीनगर अमन अपार्टमेंट परिसरात गटार व पायवाट करणे.<br>९. प्र.क्र.३२ मधील शिवाजी नगर शिंदे चाळ परिसरात गटार व पायवाट करणे. |
| प्रस्तावाची सूचना क्रमांकः१४ | सन्मा.सदस्या सौ.फरझाना शाकीर शेख यांनी दिनांक १४.१०.२०२१ रोजींच्या पत्रान्वये लेखी स्वरुपात दिलेली प्रस्तावाची सूचना.<br>विषय ः प्रभाग क्र.३२ मधील “लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजना” अंतर्गत सन २०२१-२२ मध्ये निधी उपलब्ध करुन खालील नागरी सुविधांची कामे करणेबाबत.<br>१. प्र.क्र.३२ मधील खडी मशिन रोड अमन कॉम्प्लेक्स परिसरात गटार व पायवाट करणे.<br>२. प्र.क्र.३२ मधील अचानकनगर परिमंद दुबे चाळ परिसरात गटार व पायवाट करणे.<br>३. प्र.क्र.३२ मधील अचानकनगर प्रतिमा अपार्टमेंट परिसरात गटार व पायवाट करणे.<br>४. प्र.क्र.३२ मधील भिमनगर शिवनेरी चाळ परिसरात गटार व पायवाट करणे.<br>५. प्र.क्र.३२ मधील खडी मशिन रोड मेमन कॉलनी परिसरात गटार व पायवाट करणे. |
| प्रस्तावाची सूचना क्रमांकः१५ | सन्मा.सदस्य श्री.माणिक बाबू पाटील यांनी दिनांक १४.१०.२०२१ रोजींच्या पत्रान्वये लेखी स्वरुपात दिलेली प्रस्तावाची सूचना.<br>विषय ः लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत सन २०२१-२२ मध्ये नागरी सुविधांची कामे करणेसाठी अनुदान प्राप्त करुन देणेबाबत.<br>१. वा.प्र.स. अंतर्गत प्र.क्र.१६ ड शांतीनगर येथील विजय देवकर ते रंजना दूबे यांच्या घराच्या परिसरात गटार व पायवाट करणे.<br>२. वा.प्र.स. अंतर्गत प्र.क्र. १६ ड शांतीनगर येथील मन्साराम मोरे ते दिपक सरवळकर यांच्या घराच्या परिसरात गटार व पायवाट करणे.<br>३. वा.प्र.स. अंतर्गत प्र.क्र. १६ ड शांतीनगर येथील मुक्तराम ते कदम यांच्या घराच्या परिसरात गटार व पायवाट करणे.<br>४. वा.प्र.स. अंतर्गत प्र.क्र. १६ ड शांतीनगर येथील आशा भोसले ते सुरेश पांगे यांच्या घराच्या परिसरात गटार व पायवाट करणे.<br>५. वा.प्र.स. अंतर्गत प्र.क्र. १६ ड शांतीनगर येथील अतुल सकपाळ ते रविंद्र मोरे यांच्या घराच्या परिसरात गटार व पायवाट करणे.<br>६. वा.प्र.स. अंतर्गत प्र.क्र. १६ ड शांतीनगर येथील साहेबराव पाटील ते संतोष चव्हाण यांच्या घराच्या परिसरात गटार व पायवाट करणे.<br>७. वा.प्र.स. अंतर्गत प्र.क्र. १६ ड शांतीनगर येथील सावर्डेकर ते माळी यांच्या घराच्या परिसरात गटार व पायवाट करणे.<br>८. वा.प्र.स. अंतर्गत प्र.क्र. १६ ड शांतीनगर येथील बालाजी भोसले यांच्या घराच्या परिसरात गटार व पायवाट करणे.<br>९. वा.प्र.स. अंतर्गत प्र.क्र. १६ ड शांतीनगर येथील जाधव यांच्या घराच्या परिसरात गटार व पायवाट करणे.<br>१०. वा.प्र.स. अंतर्गत प्र.क्र. १६ ड शांतीनगर येथील नाना-नानी पार्क परिसरात गटार व पायवाट करणे. |
| प्रस्तावाची सूचना क्रमांकः १६ | सन्मा.सदस्या सौ.रुपाली चंदन गोटे यांनी दिनांक १४.१०.२०२१ रोजींच्या पत्रान्वये लेखी स्वरुपात दिलेली प्रस्तावाची सूचना.<br>विषय ः प्रभाग क्रमांक ३१ ब मधील लोकशाहील अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजना अंतर्गत सन २०२१-२२ मध्ये निधी उपलब्ध करुन खालील नागरी सुविधांची कामे करणे बाबत.<br>१. प्र.क्र.३१ ब मधील आंबेडकर नगर परिसरातील समाज मंदिरांची दुरुस्ती करणे.<br>२. प्रभाग क्रमांक ३१ ब मधील शैलेश नगर परिसरातील समाज मंदिराची दुरुस्ती करणे.<br>३. प्रभाग क्रमांक ३१ ब मधील सम्राट नगर परिसरातील समाज मंदिराची दुरुस्ती करणे.<br>४. प्रभाग क्रमांक ३१ ब मधील हनुमाननगर नाल्यालगतच्या परिसरातील समाज मंदिराची दुरुस्ती करणे.<br>५. प्रभाग क्रमांक ३१ ब मधील गांवदेवी शौचालया लगतच्या परिसरात गटार व पायवाट तयार करणे. |
| प्रस्तावाची सूचना क्रमांकः१७ | सन्मा.सदस्या श्रीमती नादीरा यासिन सुर्मे यांनी दिनांक १४.१०.२०२१ रोजींच्या पत्रान्वये लेखी स्वरुपात दिलेली प्रस्तावाची सूचना.<br>विषय ः प्रभाग क्रमांक २९ ब मधील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजना अंतर्गत सन २०२१-२२ मध्ये निधी उपलब्ध करुन खालील नागरी सुविधांची कामे करणे बाबत.<br>१. प्र.क्र.२९ ब मधील फल्हा कॉम्प्लेक्स ते लेक प्लाझा परिसरात पायवाट तयार करणे.<br>२. प्र.क्र.२९ ब मधील लेक प्लाझा ते चाळ नं.१ परिसरात पायवाट तयार करणे.<br>३. प्र.क्र.२९ ब मधील बागे ज्वेहरा ते चाळ नं.३ परिसरात पायवाट तयार करणे.<br>४. प्र.क्र.२९ ब मधील चाळ नं.२ ते ऑरर्चीड टॉवर परिसरात पायवाट तयार करणे.<br>५. प्रभाग क्रमांक २९ ब मधील जैतून बाग ते म्हाडा कॉलनी परिसरात पायवाट व गटर तयार करणे. |

पान ४ वर


### दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड, ठाणे
प्रधान कार्यालय, छत्रपती शिवाजी पथ, ठाणे (प.) (पो.बॉ. नं. १९)

**निविदा सूचना**

बँकेच्या ११७ शाखा व केंद्र कार्यालय व इतर कार्यालयांमध्ये वर्षातून ४ वेळा किटकनाशक औषध फवारणी (Pest Control) करून घेणेकरिता नामांकीत ठेकेदारांकडून मोहोरबंद निविदा दि. २७.१०.२०२१, दु. ३.३० वाजेपर्यंत मागविण्यात येत आहेत. निविदेसाठी इसारा रक्कम रु. १०,०००/- रोखीने भरणे आवश्यक आहे. सोबत (चेक, डी.डी., पे-ऑर्डर) स्विकारले जाणार नाहीत.

निविदा फॉर्म बँकेच्या प्रधान कार्यालयात ओएस्डीओ विभागात प्रति निविदा रु. १,०००/- + जी.एस्.टी ना परतावा रक्कम भरून कामकाजाचे दिवशी दि. २६.१०.२०२१ रोजी दुपारी २.३० वाजेपर्यंत उपलब्ध होतील. सदर मोहोरबंद निविदा बँकेच्या सोयीनुसार उघडण्यात येतील. तसेच कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्विकारण्याचा वा सर्व निविदा नाकारण्याचा हक्क बँक राखून ठेवीत आहे.

दि. १९.१०.२०२१

सही/-
राजेंद्र माधवराव दोंदे
मुख्य कार्यकारी अधिकारी

सही/-
राजेंद्र गोपाळ पाटील
अध्यक्ष

**जाहीर सुचना**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात मनुद केलेली मौजे दहीवली तालुका कल्याण जि. ठाणे येथील मिळकती आमचे अशिल श्री.नितेश पंढरीनाथ मढवी व श्री. आकाश चंद्रकांत कारभारी रा. सोनाळे, ता. भिवंडी, जि. ठाणे यांनी रजिस्टर्ड खरेदी खताने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर मिळकतीसंबंधी कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध, गहाण, दान, लीज, लीन, बक्षीस, फरोक्त, पोटगी, वहीवाट, करार, बोजा, वारसा आदी किंवा कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध असल्यास अशा व्यक्तींनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत खालील पत्त्यावर आपल्याकडील हक्क दर्शविण्याऱ्या कागदपत्रासह लेखी हरकत घ्यावी व त्याप्रमाणे न केल्यास सदर मिळकतीवर कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध नाहीत, अगर असल्यास ते सोडुन दिले आहेत असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व व्यवहार पूर्ण झाल्यानंतर कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

| खातेदाराचे नाव | गाव | सर्वे क्र. | क्षेत्र हे.आर.चौ.मी | पो.ख. | आकार |
|---|---|---|---|---|---|
| श्री.संकेश रघुनाथ भोईर | दहीवली | ५/२ | ०.२७.०० | ०.०३.०० | ०.३६ |
| श्री.संकेश रघुनाथ भोईर | दहीवली | ६/३ | ०.१५.०० | --- | १.६४ |

पत्ता: गुरुदेव शॉपिंग प्लाझा २ रा मजला,
स्व. मिनाताई ठाकरे नाट्यगृहाजवळ,
भिवंडी-४२१ ३०८
मो.नं.९६५७९३२८३९

सही/-
ॲड.उदेश काथोड केणे
खरेदीदाराचे वकील

### Premnagar Co-op. Hsg. Society Ltd.
PH.:2532 1523
(Regd. No. TNA / HSG./ 124/1964)
THANE (E) 400 603.

Our Ref No. Date: 18/10/2021

**QUOTATION NOTICE**

The Secretary, Premnagar co-operative Housing society Ltd. Thane-east-400603 invites sealed quotations from the qualified and experienced structural engineers registered with Municipal corporations for the work of structural audit of its 10 buildings.

The blank quotation forms along with terms and conditions and scope of the work can be had from the office of the society on any working day between 11.00 hours and 13.00 hours on non-refundable payment of Rs. 1000=00 (Rupees One thousand only) in cash. The last date for receipt of complated quotation forms is 8/11/2021 (up to 13.00 hours).

Refundable earnest money payable with completed quotation form is Rs.8000=00 (Rupees eight thousand only).

**for PREMNAGAR CO-OP HSG, SOC. LTD**
**Sd/-**
**Chairman**

**जाहीर सुचना**

सर्व संबंधितांस कळविण्यात येते की, खालील मिळकती या ठाणे शहराच्या मंजूर विकास योजनेतील निम्न लिखित प्रयोजनाकरीता आरक्षित केलेल्या आहेत. निम्नलिखित उल्लेखित केलेल्या मिळकती संपादित करावयाचे प्रयोजनार्थ सदर भूधारकाने त्यास मोबदल्याचे स्वरुपात हस्तांतरीत विकास हक्क प्रमाणपत्र मिळणेकरीता ठाणे महानगरपालिकेकडे अर्ज केला आहे.

| क्र. | गावाचे नाव | सर्वे न. व गट नं. | अर्जदाराचे नाव | आरक्षणाचे प्रयोजन |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे मोघरपाडा, ता.व जि.ठाणे. | सर्व्हे नं.१४ हिस्सा नं.८ | कै.रतनशी प्रेमजी धर्मदाय ट्रस्ट | ६० मी. रुंद रस्ता |

टीडीआर/टेंम्प/१२०८/२१

तरी सदरहू मिळकतीवर वा मिळकतीचे भागावर मालकी हक्क, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, कुळ, भाडेकरुपणाचे हक्क, विश्वस्त, वारसा, देखभाल, लीज, कुळवहिवाट, पोटगी, साठेकरार, बयाणा या तत्सम कोणत्याही प्रकारचा दावा, मालकी वा हक्क, हितसंबंध व अन्य हितसंबंध प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपली हरकत वा आपले हक्क, हितसंबंधाचे स्वरुप स्पष्ट करुन खाली सही करणार यांचे कार्यालयात लेखी कळवावे.

विहित मुदतीत कोणाकडुनही काही लेखी हरकत, तक्रार वा दावा न आल्यास सदर अर्जदारास हस्तांतरणीय विकास प्रमाणपत्र' देण्यास कोणाचीही हरकत नाही असे गृहीत धरुन महानगरपालिका तदनुषंगीक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करेल तसेच विहित मुदतीबाहेर आलेल्या तक्रारी, हरकती, दावे या रद्दबातल आहेत वा सोडून देण्यात आलेल्या आहेत, असे समजण्यात येईल.

पत्ता: फ्लॅट नं. १०३, पहिला मजला, श्रीसदन, घंटाळी, नौपाडा, ठाणे. ४०० ६०२

दिनांक: १८/१०/२०२१

शिक्का

सही/-
(श्री.प्रसाद के. कुलकर्णी)
वकील

## CLASSIFIEDS ठाणेवैभव

**छोट्या जाहिरातींसाठी संपर्क कार्यालय**
**ठाणे - २५३४१५२६/२५३४८५९४**

**ऑफिस भाड्याने देणे आहे**
टोटल कार्पेट एरिया, ११५८.६७ स्क्वे.फु., ३ कॅबिन, १ रिसेप्शन, १ पॅन्ट्री, २ बाथरूम टेरेस सोबत शिवनेरी बिल्डिंग, पहिला माळा, गावदेवी, ठाणे रेल्वे स्टेशनजवळ. ८९७६८२३७५२

**विकणे आहे**
टेंभी नाका परिसरात २०० आणि २५० चौ.फूटाचा बेसमेंट गाले विकायला आहे.
संपर्क - ९८१९२४९२८०

**Courier Services**
Thane International Courier
आमच्या येथून परदेशात दिवाळीचे फराळ व कपडे भांडी इ. साहित्य (U.S.A., Canada, Australia) व इतर देशात योग्य दरात पाठवले जाईल.
संपर्क - ९८७०१७७८९९

**Requirement**
B.A., B.Ed-Eng, B.S.C., B.Ed-Math Teachers with 3-4 Years experience studied through out English Medium school, Apply on 23/10/2021 to the Add- Principal Smt. Kaveritai Patil English Medium School, Old Belapur Road, Near Kalwa Prabhag Samiti, Kalwa, Thane-400605

**Requirement**
No Brokage Payinguest Dormitory Available Near Thane (W) Station. Five minutes walk. Contact 9821657047 Kumar

**हात स्वच्छ धुवा कोरोना टाळा**

'ठाणेवैभव' दैनिकातील जाहिराती या जाहिरातदारांनी दिलेल्या मजकुरानुसार छापल्या जातात. या मजकुराच्या सत्यतेबाबतची खातरजमा वाचकांनी स्वतःच्या जबाबदारीवर करावयाची आहे. 'ठाणेवैभव' यांचा याबाबत कोणतीही आर्थिक वा कायदेशीर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष जबाबदारी राहणार नाही.













# ठाणेवैभव आदर्श शिक्षक पुरस्काराचा दिमाखदार सोहळा संपन्न

ठाणेवैभव आणि समर्थ ॲडव्हर्टायझर्स, कल्याण यांच्या संयुक्त विद्यमाने नुकताच छत्रपती शिक्षण मंडळाचे अभिनव विद्यामंदिर सभागृहात कल्याण येथे मोठ्या दिमाखात 'गुरुवंदना विशेषांक' सोहळा तसेच आणि आदर्श शिक्षक पुरस्काराचा समारंभ मोठ्या उत्साहत संपन्न झाला. गुरुवंदना विशेषांकाचे प्रकाशन आ. संजय केळकर यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. वैद्यही दप्तरदार, ठाणेवैभवचे कार्यकारी संपादक निखिल बल्लाळ आणि समर्थ ॲडव्हर्टायझर्स कल्याणचे संचालक मच्छिंद्र कांबळे उपस्थित होते. यावेळी अध्यापनाचे पवित्र कार्य करणाऱ्या शिक्षकांचा सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, बुके व गुरुवंदना विशेषांक भेट देऊन यथोचित गौरव करण्यात आला.

अंजली रमेश घायवट, संगिता बाजीराव ठुबे, जयराम शंकर मांजरे, यशवंत रामचंद्र केदार, राजश्री शालीग्राम बडगुजर, अरुणा मधुकर पाटील, अनघा सोनकांबळे, विजयकुमार जाधव, विजयकुमार भोईर, अशोक गायकवाड, मनिषा सुरेश डोके, प्रविण रणजीत बडे, संचिता संजय धारवणे, फारुक सादिक शेख, दिलशाद फारुक शेख, सुनिल दादाभाऊ मोरे, सतिष नारायण भोईर, संगीता नामदेव चौधरी, संगीता तुकाराम देसले, काशिनाथ शिवाजी भोईर, मिनाक्षी मनोज भारती, नरेंद्र हिरामण कोष्टी, नामदेव बादशहा राहाणे, प्रदीप भाऊसाहेब काकड, आनंद विठ्ठल जाधव, संगिता भगवान पाटील, पुष्पलता का. गायकवाड, मुकुंद भास्कर कांबळे, कांतीलाल लहानु भोये, रंजना सुरेश मोरे, अनिता मारुती करकंडे, दर्शना बाळू वेखंडे, चंद्रकांत दत्तू मोंडूळे, जयवंत महादू मलिक, मनोज कोंडीराम गुरसाळी, मनोहर किसन शेलवले, राजकुमार लक्ष्मण शेलवले, दलिता भाऊराव मगर, संतोष रामू सापळे, रविकांत देसले, रविंद्र नामदेव डगळे, कुमूद लक्ष्मण विशे, नामदेव बाळू बांगर, भास्कर दगडू मांडे, अनिता आनंद चौगुले, सुवर्णा सतीश कोथमिरे, राजश्री राजेश रोठे, सीमा बबरु ईगवे, संजय रघुनाथ लांडगे, विनोद भानुदास शिंदे, डॉ. वैदेही दप्तरदार आदी मान्यवर आदर्श शिक्षक पुरस्काराचे मानकरी ठरले.
















पान १ वरुन

## नवा व्हेरिअंटही येणार नाही!

**नव्या व्हेरिअंटची शक्यता फारच कमी**

डॉ. व्ही रवी यांच्या म्हणण्यानुसार दक्षिण अमेरिका आणि दक्षिण आफ्रिकेपर्यंत मर्यादित असलेले Mu आणि C.1.2 सारखे नवे व्हेरिअंट भारतात येण्याची शक्यता फारच कमी आहे. त्यातही नवा व्हेरिअंट आलाच तर तो डेल्टा किंवा डेल्टा प्लस इतका घातक नसेल. डेल्टा प्लस हाच दुसऱ्या लाटेसाठी कारणीभूत व्हेरिअंट होता.

## ठामपात हमरी-तुमरी

आले होते. हे बॅनर्स शिवसेनेच्या नगरसेवकांनी फाडले असल्याचा आरोप राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे. सोमवारी शहर अध्यक्ष आनंद परांजपे आणि राष्ट्रवादीचे पदाधिकारी याचा जाब विचारण्यासाठी थेट महापौरांच्या दालनात पोचले. बॅनर्स शिवसेनेच्या नगरसेवकांनी फाडले असून आमच्याकडे याचे पुरावे असल्याचे परांजपे यांनी महापौरांना सांगितले. गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी देखील या मुद्द्यावरून शिवसेनेवर टीका केली होती. ज्या ठिकाणी लसीकरण महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. त्या ठिकाणी शिवसेनेचे दोन नगरसेवक असून शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांची बॅनरबाजी करण्यात आली होती. कळवा-मुंब्रा हा मतदार संघ गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांच्या मतदार संघात येत असून शिष्टाचाराप्रमाणे त्यांचे नाव टाकणे देखील आवश्यक असल्याचा मुद्दा राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित केला.

कोपरी पाचपाखाडी आणि ठाणे शहर या दोन मतदार संघात लसीकरण मोहिमेची परवानगी द्यावी आणि शिवसेनेच्या म्हण्याप्रमाणे मंडप आणि इतर खर्च हे कार्यकर्ते उचलत असतात असल्याने आम्ही मंत्री जितेंद्र आव्हाड यांचा वयक्तिक 20 लाखांचा धनादेश आणि निवेदन आणले असल्याचे आनंद परांजपे यांनी महापौरांना सांगतले.

महापौरांनी धनादेश न स्वीकारता आपण गटनेते आणि विरोधी पक्षनेते यांच्याशिवाय कोणाला ओळखत नसल्याचा पवित्रा महापौरांनी घेतला. लसीकरण होणे आवश्यक असून या लसीकरणात तीन हजारांपेक्षा अधिक लसीकरण झाले असून शिवसैनिकांनी विशेष मेहनत घेऊन, नागरिकांच्या घरात जाऊन लोकांना लस घेण्यासाठी बाहेर काढले. मात्र कळव्यात शिवसैनिकांनी नागरिकांच्या हिताचे काम केले आणि याचे श्रेय घ्यायला मिळाले नाही म्हणून विरोधकांमध्ये पोटशूळ निर्माण झाला असल्याची टीका महापौरांनी यावेळी केली. विरोधी पक्षनेत्यांनी निवेदन दिल्यावर या वादावर अखेर पडदा पडला.

ज्या ठिकाणी राष्ट्रवादी लसीकरणासाठी परवानगी मागत आहेत त्या ठिकाणी 90 टक्के लसीकरण झाले असून खरं तर सर्वात कमी लसीकरण हे मुंब्र्यात झाले आहे. त्या ठिकाणी लसीकरण घेणे आवश्यक आहे. आधी आपलं घर बघा मग दुसरीकडे विचार करा, मुंब्र्यात जर लसीकरण घेणे राष्ट्रवादीला शक्य होत नसेल तर आम्ही त्या ठिकाणी लसीकरण राबवतो. कळव्यातील लसीकरण महोत्सवात तीन हारांपेक्षा अधिक लसीकरण झाले आहे ही शिवसैनिकांची मेहनत आहे. केवळ श्रेय घ्यायचे आहे म्हणून हा प्रकार सुरु असून मला कोणत्याही प्रकारचा धनादेश देण्यात आलेला नाही, असे महापौर नरेश म्हस्के यांनी सांगितले.

शिवसेनेचे खोटे बोला पण रेटून बोला असे धोरण आहे. राष्ट्रवादीचे बॅनर्स हे शिवसेनेच्या नगरसेवकांनी फाडले असल्याचे पुरावे आमच्याकडे आहेत. आम्ही कोपरी-पाचपाखाडी आणि ठाणे शहर या दोन मतदार संघात लसीकरण महोत्सवाची परवानगी मागितली. ती द्यायला हवी होती. यासाठी 20 लाखांचा धनादेश देखील आणला होता. खरं तर महापौर या नात्याने त्यांनी सर्वसामान्य ठाणेकरांशी सौजन्याने बोलणे आवश्यक आहे मात्र त्यांना महापौर पदाचा गर्व झाला आहे. याचा त्रास शिवसेनेच्या मतदार संघात होऊ शकतो याचा विचार शिवसेनेने करावा, असा इशारा आनंद परांजपे यांनी दिला आहे.

## दूषित पाण्याचा पुरवठा

केली नाही तर महापालिकेकडे बघावे लागेल असा इशारा दिला होता. त्यानंतर या भागाचा पाणी पुरवठा सुरळीत झाला नसल्याचेच दिसून आले आहे.

दरम्यान, पाण्याच्या याच मुद्यावरुन विरोधी पक्षनेते शानु पठाण यांनी सोमवारी सकाळी आठ वाजेपासून पाण्याची टंचाई असलेल्या भागाची पाहणी करुन दुपारी 1 वाजता महापालिका मुख्यालयातील आयुक्तांच्या दालनाबाहेर ठिय्या आंदोलन केले. पाण्याच्या समस्येवर तोडगा निघत नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नसल्याचा इशारा त्यांनी यावेळी दिला. पाण्याची समस्या असतांना मुंब्र्यात जे पाणी सोडले जात आहे, ते देखील गढूळ स्वरुपात येत असल्याने तेच गढूळ पाणी घेऊन त्यांनी ठिय्या मांडला होता. अखेर अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी आणि पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता विनोद पवार यांनी पठाण यांची मनधरणी केली. त्यानुसार पाण्याचा दाब वाढविण्याबरोबर येथील टाकीची समस्या सोडवली जाईल असे आश्वासन दिल्यानंतर त्यांनी आंदोलन मागे घेतले.

## अम्युझमेंट पार्कचे दरवाजे उघडणार

मुलांच्या लसीकरणासंदर्भात केंद्राच्या संपर्कात राहून लस उपलब्ध करुन घेणे तसेच याबाबतीत निर्णय झाल्यावर लसीकरणाची तयारी ठेवण्याचे नियोजन करण्याच्या सूचनाही त्यांनी सार्वजनिक आरोग्य विभागास केल्या. करोनाची दुसरी लाट ओसरली असली तरी तिसऱ्या लाटेचा धोका अद्याप कायम असून नियमित मास्क घालणे, सुरक्षित अंतर पाळणे व हात स्वच्छ धूत राहणे खूप आवश्यक आहे, असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, याबाबतीत लोकांनी बेसावध राहू नये म्हणून मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यात यावी. करोनावरील उपचारांसाठी जगात नवनवीन प्रयोग होत असून येणाऱ्या नवीन औषधांच्या बाबतीतही त्यांची परिणामकारकता, किंमत, उपलब्धता याबाबत आतापासूनच माहिती घेत राहावी व संबंधितांच्या संपर्कात राहावे, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

या बैठकीस मुख्य सचिव सीताराम कुंटे, आरोग्य विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. प्रदीप व्यास, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव आशिष कुमार सिंह, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, मदत व पुनर्वसन विभागाचे प्रधान सचिव असिमकुमार गुप्ता, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव सौरव विजय, संचालक डॉ. दिलीप म्हैसेकर, मुख्यमंत्र्यांचे विशेष सल्लागार डॉ. दीपक म्हैसेकर, मुंबई पालिका उपायुक्त सुरेश काकाणी, टास्क फोर्सचे डॉ. संजय ओक, शशांक जोशी, डॉ. राहुल पंडित, डॉ. खुसराव्ह, डॉ. अजित देसाई, डॉ. सुहास प्रभू आदी उपस्थित होते.

## शेडसाठी ६३ लाखांची उधळपट्टी

मात्र, पोखरण रोड क्रमांक दोन येथील व्होल्टास कंपनीच्या जागेवर कोविड सेंटर नेमके कशासाठी उभारले आणि त्याचा नक्की काय फायदा झाला हे कोडे अद्याप कुणालाही उलगडलेले नाही. सिडकोने या कोविड सेंटरसाठी निधी देण्याचे मंजूर केले होते. ठाणे महापालिकेने ते काम वादग्रस्त पद्धतीने एका कंत्राटदाराच्या घशात घातले होते. केंद्र उभारणी आणि त्यात आवश्यक असलेल्या वैद्यकीय साधन सामग्रीसाठी 16 कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. त्यापैकी 15 कोटी रुपये सिडकोने अदा केले आहेत. मात्र, एवढा प्रचंड खर्च झाल्यानंतरही या सेंटरमध्ये एकही कोरोना रुग्ण दाखल करण्यात आलेला नाही. कोरोनाचा संसर्ग आता झपाट्याने कमी होत असून तिसऱ्या लाटेची शक्याताही धूसर होत चालली आहे. त्यामुळे व्होल्टास केंद्रासाठी वादग्रस्त पद्धतीने खर्च केलेले 16 कोटी रुपये जवळपास निष्फळ ठरले आहेत. त्यातच या केंद्राभोवती आता नवा वाद उभा ठाकला आहे.

व्होल्टास कंपनीच्या आवारातील ज्या शेडमध्ये हे केंद्र उभारले आहे ती शेड 40 ते 50 वर्षे जूनी असून जीर्ण झालेली आहे. उन्हाळ्यात त्याला तडे गेले होते. या ठिकाणच्या अँगल्सला लागलेला गंज खाली पडत होता. तसेच, पत्रा तापल्याने कोविड केंद्रात गरम वाफाही येत होत्या. त्यामुळे या केंद्रात तात्पुरत्या स्वरुपातील शेड उभारणी अत्यावश्यक असल्याचे सांगत प्रशासनाने 63 लाख रुपये खर्चाचा प्रस्ताव तयार केला होता.

जून महिन्यांत झालेल्या सर्वसाधारण सभेतील विषय पत्रिकेवर हा विषय घेण्यात आलेला नव्हता. मात्र, ऑक्टोबर महिन्यांतील विषय पत्रिका, गेल्या महासभेत झालेले ठराव आणि इतिवृत्ताची कॉपी हाती पडल्यानंतर या 63 लाख रुपये खर्चाचा ठराव आयत्या वेळच्या विषयांमध्ये मंजूर करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. या प्रस्तावाबाबतची कोणतीही माहिती कोणत्याही नगरसेवकाला दिली गेली नव्हती. आयत्या वेळच्या विषयपत्रिका देण्याची तसदीसुध्दा सचिव विभाग घेत नाही. वादग्रस्त विषय परस्पर विषय घुसडून त्यावर कोणतीही चर्चा न करता ते मंजूर केले जात असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. कोरोना संक्रमणामुळे पालिकेच्या तिजोरीत खडखडाट असताना अशा पद्धतीने ठेकेदारांचे खिसे भरण्याचे उद्योग सत्ताधारी शिवसेनेने थांबवायला हवेत असा टोला मृणाल पेंडसे यांनी लगावला आहे.

## ठाण्यात कोरोनाचे ५४ नवीन रुग्ण

लोकमान्य-सावरकरनगर, नौपाडा-कोपरी आणि कळवा प्रभाग समिती क्षेत्रात प्रत्येकी चार रुग्ण वाढले आहेत. प्रत्येकी एक रुग्ण वागळे आणि मुंब्रा प्रभाग समिती परिसरात नोंदवले गेले आहेत. दिवा येथे एकही रुग्ण आढळून आलेला नाही. विविध रुग्णालयात आणि घरी उपचार घेत असलेल्या रुग्णांपैकी 67जण कोरोनामुक्त झाले आहेत. आत्तापर्यंत एक लाख 37 हजार 633 रुग्णांनी कोरोनावर मात केली आहे तर रुग्णालयात आणि घरी 637 रुग्णांवर उपचार सुरु आहेत. आज एक रुग्ण दगावला असून आत्तापर्यंत दोन हजार 93जणांचा मृत्यू झाला आहे. महापालिका प्रशासनाने काल शहरातील एक हजार 554 नागरिकांची चाचणी घेतली होती. त्यामध्ये 54जण बाधित मिळाले आहेत. आत्तापर्यंत 20 लाख 32 हजार 111 ठाणेकरांची चाचणी घेण्यात आली असून त्यामध्ये एक लाख 40 हजार 362जण बाधित मिळाले आहेत.

## तायडे दलित पँथरच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी

पक्षात जातात याविषयी ठाण्यात चर्चेला उधाण आले होते. 2007 पासून ते या पदावर कार्यरत होते. मात्र त्यापदाचा राजीनामा देऊन त्यांनी सोमवारी नामदेव ढसाळ यांच्या दलित पँथरमध्ये प्रवेश केला. संघटनेच्या नेत्या मल्लिका ढसाळ यांनी त्यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड केली.

संघटनेचे संस्थापक अध्यक्ष नामदेव ढसाळ यांचा दलित पँथर पूर्वी प्रमाणेच जहाल होऊन दलितांना न्याय मिळवून देण्याचे काम करेल, असा विश्वास यावेळी तायडे यांनी दिला.

## मांडीवर थापले जाते समोशाचे पीठ

तर कोणाच्या आशीर्वादाने ही अनधिकृत दुकाने, हॉटेल शहरात चालू आहे. याचे उत्तर हे प्रशासनाने द्यावे, तसेच अशा गलिच्छ पद्धतीने पदार्थ विकून संबंधित हॉटेल चालकावर कार्यवाही करण्याची मागणी ही मराठी एकीकरण समितीचे कल्याण शहर समनव्यक ह्यांनी अन्न आणि औषध प्रशासनाला केली आहे. त्यावर लवकरच लेखी तक्रार ही अन्न आणि औषध प्रशासन ह्यांना करणार आहोत अशी माहिती गणेश तिखंडे आणि भूषण राजेंद्र पवार ह्यांनी दिली.

## आंतरराष्ट्रीय ट्रेड युनियनवर निवड

असलेल्या स्वित्झर्लंड देशाची राजधानी असलेल्या जिनिव्हा शहरात "इंडस्ट्री ऑल ग्लोबल युनियन" या आंतरराष्ट्रीय ट्रेड युनियन संघटनेचे जागतिक मुख्यालय आहे. या संघटनेच्या 60 जणांच्या कार्यकारी मंडळासाठी दर चार वर्षांच्या कालावधीकरिता ऑनलाईन पद्धतीने जागतिकस्तरातून निवडणूक घेण्यात आली. चार हजार प्रतिनिधींमधून, दक्षिण आशिया पॅसिफिक युनियन विभागातून हिंद मजदूर सभेचे महाराष्ट्र सरचिटणीस असलेले संजय वढावकर यांची व इंटक या कामगार संघटनेचे अखिल भारतीय अध्यक्ष असलेले डॉ. संजीव रेड्डी अशा दोघांचीच निवड भारतातून झाली आहे.

भारत, श्रीलंका, पाकिस्तान, नेपाळ आणि बांगलादेश या पाच देशांचे कामगार प्रतिनिधी म्हणून संजय वढावकर यांच्यावर जबाबदारी असणार आहे. इंटरनॅशनल ट्रान्सपोर्ट फेडरशन या वाहतूकदारांच्या जागतिक संघटनेच्या माध्यमातून या उद्योग व्यवसायाच्या आणि या व्यवसायातील कामगारांच्या हितासाठी कार्यरत राहण्याचीही जबाबदारी संजय वढावकर यांच्यावर आहे.

92 लाख सभासद संख्या असलेल्या भारतातील तिसऱ्या क्रमांकाची कामगार संघटना असलेल्या अखिल भारतीय हिंद मजदूर सभा या राष्ट्रीय कामगार संघटनेचे संजय वढावकर हे गेली अनेक वर्ष कार्यकारिणी सदस्य आहेत. पाच लाख सभासद संख्या असलेल्या गोदी, बंदरे, बेस्ट, रेल्वे, नागरी वाहतूक, एस.टी. सेवा, कोळसा उद्योग, साखर उद्योग, डिफेन्स क्षेत्र, आदी उद्योगात लाखो कामगारांचे समर्थपणे प्रतिनिधित्व करणाऱ्या हिंद मजदूर सभेच्या महाराष्ट्र राज्याच्या सरचिटणीस पदावर संजय वढावकर हे कार्यरत आहेत. तसेच दोन लाख सभासद संख्या असलेल्या अखिल भारतीय मेटल इंजिनिअरिंग फेडरेशन संघटनेच्या अखिल भारतीय सरचिटणीस पदावरही संजय वढावकर कार्यरत आहेत.

## ॲमेझॉन फ्रेश सेंटर्समध्ये फ्रेश संरचनेत दुप्पटीने वाढ

**ठाणे:** ॲमेझॉनने आपली फ्रेश प्रक्रिया क्षमता गेल्या वर्षापासून दुप्पटीहून अधिक वाढवली आहे. नाशवंत पदार्थ, मुलभूत पदार्थ तसेच घरगुती उत्पादनांचा समावेश असलेले दैनंदिन किराणा सिलेक्शन आता अतिजलद डिलिव्हरीसाठी उपलब्ध ॲमेझॉन इंडियाने आज आपल्या ॲमेझॉन फ्रेश या दैनंदिन गरजेच्या वस्तू व किराणामाल अतिजलद म्हणजेच 2 तासांत डिलिव्हर करणाऱ्या ॲमेझॉन फ्रेश या विभागाच्या विशेषीकृत संरचना नेटवर्कमध्ये लक्षणीय विस्ताराची घोषणा केली.

या विस्तारामुळे कंपनीने आपली प्रक्रिया क्षमता गेल्या वर्षीच्या तुलनेत दुप्पटीहून अधिक वाढवली आहे आणि आता नवी दिल्ली, गुडगाव, नोएडा, मुंबई, ठाणे, वाशी, अहमदाबाद, जयपूर, पुणे, बेंगलोर, म्हैसूर, चेन्नई, हैदराबाद व कोलकाता या भारतातील 14 शहरांमध्ये ॲमेझॉन फ्रेशची 35 डेडिकेटेड केंद्रे आहेत. ग्राहकांच्या ऑर्डर्स पूर्ण करणाऱ्या अन्य प्रकारांतील इमारतींच्या संरचनेचाही कंपनीने विस्तार केला आहे. त्यातून स्थानिक स्तरावर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होणार आहे आणि त्यासाठी नियुक्तीची प्रक्रिया यापूर्वीच सुरु झाली आहे. या विस्तारामुळे कंपनीकडे आता ॲमेझॉन फ्रेश सिलेक्शनमधील लाखो क्युरेटेड वस्तूंच्या साठवणीसाठी तसेच फुलफिलमेंटसाठी सुमारे 10 लाख (1 दशलक्ष) चौरस फूट डेडिकेटेड जागा आहे. उत्पादने सुरक्षितपणे साठवता येतील असा पद्धतीने या इमारतींची रचना करण्यात आली आहे आणि ग्राहकांच्या ऑर्डर्सवर अत्याधुनिक उपकरणे व तंत्रज्ञानाच्या मदतीने प्रक्रिया केली जात आहे. यामध्ये कोरडा किराणामाल, फळे व भाज्यांसाठी स्वतंत्र साठवण संरचना तसेच थंड व फ्रोजन वस्तूंसाठी खास तापमान नियंत्रणाची सुविधा असलेल्या खोल्या प्रत्येक विभागाकरता तयार करण्यात आल्या आहेत. फ्रोजन तसेच थंड वस्तूंची डिलिव्हरी दुर्गम भागात करण्यासाठी कंपनीकडे इंटिग्रेटेड जेल पॅड फ्रीजर्सही आहेत.

"आमचे ग्राहक त्यांच्या दैनंदिन आवश्यकतांच्या जलद व सुरक्षित डिलिव्हरीजसाठी आमच्यावर विश्वास ठेवतात. ॲमेझॉन फ्रेशसाठी विशेषीकृत नेटवर्कचा विस्तार केल्यामुळे आम्हाला देशातील अधिकाधिक ग्राहकांपर्यंत पोहोचणे शक्य होणार आहे. संरचनेतील या गुंतवणुकीमुळे, आम्ही ज्या 14 शहरांमध्ये ॲमेझॉन फ्रेशची उत्पादने दररोज लक्षावधी ग्राहकांना पोहोचवतो, त्यावर प्रक्रिया करतो, तेथे रोजगाराच्या संधीही निर्माण होत आहेत," असे ॲमेझॉन इंडियाच्या फुलफिलमेंट ऑपरेशन्स व पुरवठा साखळीचे उपाध्यक्ष प्रकाश दत्ता म्हणाले.

## 20 कैद्यांना कोरोना

आधारवाडी कारागृहात न्यायालयाच्या आदेशानुसार धाडण्यात आलेल्या कैद्यांना दाखल करुन घेताना त्यांची कोरोना तपासणी केली जाते. तर तपासणी अहवाल येईपर्यंत त्यांना स्वतंत्र बराकीत विलगिकरणात ठेवले जाते. या तपासणी अहवालानुसार 20 कैद्यांना कोरोनाची लागण झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर या कैद्याकडून इतरांना संसर्ग होऊ नये यासाठी या सर्व कैद्यांना ठाणे सिव्हील रुग्णालयातील विलगीकरण कक्षात धाडण्यात आले आहे. मात्र यातील कोणत्याही कैद्याला कोरोनाची कसलीच लक्षणे दिसत नसून उपचारानंतर दोन कैद्यांना पुन्हा कारागृहात पाठवण्यात आले आहे. उर्वरित कैदी विलगीकरणात आहेत.

---

### दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड, ठाणे

प्रधान कार्यालय, छत्रपती शिवाजी पथ, ठाणे (प.) (पो.बॉ. नं. १९)

**निविदा सूचना**

दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., ठाणे या बँकेस सन २०२२ सालचे कॅलेंडर्स व डायऱ्या छपाई करावयाची असून अधिकृत ठेकेदारांकडून दोन लिफाफा (टू बीड) पद्धतीने निविदा मागविणेत येत आहे. निविदा फॉर्म बँकेच्या प्रधान कार्यालयात ओ.एस्.डी.ओ. विभागात उपलब्ध होतील. निविदा फॉर्ममध्ये सविस्तर अटी व शर्ती दिल्या असून त्याप्रमाणे निविदा सादर करावयाची आहे.

| | |
|---|---|
| (१) निविदा फॉर्म विक्री, कालावधी व किंमत | कार्यालयीन कामकाजाचे दिवशी दि. २०.१०.२०२१ ते दि. २६.१०.२०२१ पर्यंत दु. २.०० वाजेपर्यंत प्रति निविदा रक्कम रु. १,०००/- + जी.एस्.टी. (ना परतावा रक्कम) भरणा करून मिळतील. |
| (२) निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख व वेळ | दि. २७.१०.२०२१ दु. ३.३० वाजेपर्यंत |
| (३) इसारा रक्कम | १) कॅलडर्सकरिता प्रति निविदा रु. २०,०००/- व २) डायऱ्या छपाईसाठी प्रति निविदा रु. १०,०००/- रोखीने भरणा करावा. (चेक, डी.डी., पे-ऑर्डर स्विकारले जाणार नाहीत.) |
| ४) निविदा उघडण्याची तारीख व वेळ | कार्यालय निश्चित करेल ती तारीख व वेळ आपणास कळविणेत येईल. |

पोस्टाने पाठविलेले निविदा फॉर्म स्विकारले जाणार नाहीत. तसेच कुठलीही अगर सर्व निविदा स्विकारण्याचे वा नाकारण्याचे अधिकार बँक राखून ठेवीत आहे.

दि. १९.१०.२०२१

सही/- राजेंद्र माधवराव दोंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी

सही/- राजेंद्र गोपाळ पाटील, अध्यक्ष

---

### अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ

जा.क्र.अनाप/पा.पू.वि./२०२१-२२/२७८ दि. १८/१०/२०२१

**निविदा सुचना क्र. ०३ सन २०२९-२२**

मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद खालील साहित्यांसाठी उत्पादक / पुरवठादारांकडून दरपत्रक मागवित आहेत. सदर कामांसाठी प्राप्त होणाऱ्या दरांनुसार अंदाजपत्रक तयार करावयाचे आहे. त्यामुळे सदर बाबींसाठी प्राप्त होणाऱ्या लघुत्तम दरानुसार त्या पुरवठादारांना साहित्य पुरवठयाचे आदेश देण्याचे प्रस्तावित नाही.

| Sr. No. | Description of Item | Required Qty | Unit |
|---|---|---|---|
| 01 | GRC Wall Structures | 72 | Sq. Ft |

दरपत्रक सादर करावयाचा कालावधी :- दि. २०/१०/२०२१ दुपारी १२.०० ते दि. २६/१०/२०२१ दु. ३.०० पर्यंत

दरपत्रक उघडणे :- दि. २६/१०/२०२१ दु. ३.०० नंतर

सही/-
(डॉ. प्रशांत रसाळ)
मुख्याधिकारी
अंबरनाथ नगरपरिषद

---

### PUBLIC NOTICE

Notice is hereby given to public that my client Mr. Raunak Kamalakar Onkar intends to purchase from i.e. 1) Mr. Tejas A. Shah & 2) Mr. Kartik A. Shah (herein after referred as the said owners),a residential Flat i.e. Flat bearing No.406 admeasuring about 66.80 sq. meter on the 4thFloor along with 2 car parking spaces i.e. at Podium (B Wing) – 106 & 107; in the building known as "Krishna B Wing" in the society known as "Neelkanth Palms Krishna –B CHS Ltd" at village Majiwada, Near Tatvagyan university, Kapurbawdi junction, Thane (w); (for the sake of brevity the said Flat and 2 parking are herein after collectively referred as the "said property"). Accordingly negotiations are going on between my client and the said owners in respect of the said property. As such before arriving for any agreement in respect of the said property, my client wants to clarify the title of the said property to its satisfaction.

All person/s, companies, firms, financial institutes, Banks, having any claim in respect of the said property by way of Agreement for Sale, Sale Deed, Exchange, Mortgage, Charge, Lien, Gift, Trust, inheritance, bequest or encumbrances or otherwise, are hereby requested to make the same known in writing along with documentary proof/s to the undersigned within 10 days from the date of the publication hereof, failing which, any such claims shall be disregarded and shall deemed to have been waived and/or abandoned.

Dated this 18 day of October, 2021

Sd/-
Mr. Shrirang Kiran Paranjape
Advocate
Off: 17, 4th Floor, Surya Mahal Building, N. M. Road, B. BhruchaMarg, Fort, Near Kala Ghoda, Mumbai – 400 001.

---

### अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ

जा.क्र.अनाप/पा.पू.वि./२०२१-२२/२७८ दि. १८/१०/२०२१

**निविदा सुचना क्र. ०३ सन २०२९-२२**

मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद खालील फर्निचरसाठी उत्पादक / पुरवठादारांकडून दरपत्रक मागवित आहेत. सदर कामांसाठी प्राप्त होणाऱ्या दरांनुसार अंदाजपत्रक तयार करावयाचे आहे. त्यामुळे सदर बाबींसाठी प्राप्त होणाऱ्या लघुत्तम दरानुसार त्या पुरवठादारांना साहित्य पुरवठयाचे आदेश देण्याचे प्रस्तावित नाही.

| Sr. No. | Description of Item | Required Qty | Unit |
|---|---|---|---|
| 01 | LA Sede High back chair | 02 | Nos |
| 02 | LA Sede Visitor chair | 02 | Nos |
| 03 | LA Sede High Mid back chair | 53 | Nos |
| 04 | LA Sede High Visitor chair | 06 | Nos |
| 05 | Scholor Desk benches | 60 | Nos |

दरपत्रक सादर करावयाचा कालावधी :- दि. २०/१०/२०२१ दुपारी १२.०० ते दि. २६/१०/२०२१ दु. ३.०० पर्यंत

दरपत्रक उघडणे :- दि. २६/१०/२०२१ दु. ३.०० नंतर

सही/-
(डॉ. प्रशांत रसाळ)
मुख्याधिकारी
अंबरनाथ नगरपरिषद

---

### अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ

जा.क्र.अनाप/पा.पू.वि./२०२१-२२/२७८ दि. १८/१०/२०२१

**निविदा सुचना क्र. ०३ सन २०२९-२२**

मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद खालील साहित्यांसाठी उत्पादक / पुरवठादारांकडून दरपत्रक मागवित आहेत. सदर कामांसाठी प्राप्त होणाऱ्या दरांनुसार अंदाजपत्रक तयार करावयाचे आहे. त्यामुळे सदर बाबींसाठी प्राप्त होणाऱ्या लघुत्तम दरानुसार त्या पुरवठादारांना साहित्य पुरवठयाचे आदेश देण्याचे प्रस्तावित नाही.

| Sr. No. | Description of Item | Required Qty | Unit |
|---|---|---|---|
| 01 | Wireless Microphone MIC | 03 | Nos |
| 02 | Wireless Keyboard | 20 | Nos |
| 03 | Mouse | 20 | Nos |
| 04 | CPU - 4 GB / 1 TB / Free DOS | 20 | Nos |
| 05 | HP Printers – Printing, Scanning & Xerox Combination | 05 | Nos |
| 06 | 4 K HDR Camcoder | 02 | Nos |

दरपत्रक सादर करावयाचा कालावधी :- दि. २०/१०/२०२१ दुपारी १२.०० ते दि. २६/१०/२०२१ दु. ३.०० पर्यंत

दरपत्रक उघडणे :- दि. २६/१०/२०२१ दु. ३.०० नंतर

सही/-
(डॉ. प्रशांत रसाळ)
मुख्याधिकारी
अंबरनाथ नगरपरिषद

---

### जाहीर सुचना

सर्व संबंधितांस कळविण्यात येते की, खालील मिळकती या ठाणे शहराच्या मंजूर विकास योजनेतील निम्न लिखित प्रयोजनाकरीता आरक्षित केलेल्या आहेत. निम्नलिखित उल्लेखित केलेल्या मिळकती संपादित करावयाचे प्रयोजनार्थ सदर भूधारकाने त्यास मोबदल्याचे स्वरुपात हस्तांतरीत विकास हक्क प्रमाणपत्र मिळणेकरीता ठाणे महानगरपालिकेकडे अर्ज केला आहे.

| क्र. | गावाचे नाव | सर्वे न. व गट नं. | अर्जदाराचे नाव | आरक्षणाचे प्रयोजन |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे कोलशेत, ता.व जि.ठाणे. | सर्व्हे नं.१/७, ८,१०,११,१२,१३,१५, २/१ **A,1B, 1C,1D, 2/3,2/4** | बॉम्बे वायर रोप्स लि. यांचे कुलमुखत्यारधारक मे. रुणवाल कन्स्ट्रक्शन. | खेळाचे मैदान आ.क्र.१३ |

टीडीआर/एसओ५/पीएलजी-५/०४०९/१७

तरी सदरहू मिळकतीवर वा मिळकतीचे भागावर मालकी हक्क, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, कुळ, भाडेकरुपणाचे हक्क, विश्वस्त, वारसा, देखभाल, लीज, कुळवहिवाट, पोटगी, साठेकरार, बयाणा या तत्सम कोणत्याही प्रकारचा दावा, मालकी वा हक्क, हितसंबंध व अन्य हितसंबंध प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपली हरकत वा आपले हक्क, हितसंबंधाचे स्वरुप स्पष्ट करुन खाली सही करणार यांचे कार्यालयात लेखी कळवावे.

विहित मुदतीत कोणाकडुनही काही लेखी हरकत, तक्रार वा दावा न आल्यास सदर अर्जदारास हस्तांतरणीय विकास प्रमाणपत्र' देण्यास कोणाचीही हरकत नाही असे गृहीत धरुन महानगरपालिका तदनुषंगीक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करेल तसेच विहित मुदतीबाहेर आलेल्या तक्रारी, हरकती, दावे या रद्दबातल आहेत वा सोडून देण्यात आलेल्या आहेत, असे समजण्यात येईल.

पत्ता: फ्लॅट नं. १०३, पहिला मजला, श्रीसदन, घंटाळी, नौपाडा, ठाणे. ४०० ६०२

दिनांक: १८/१०/२०२१

शिक्का

सही/-
(श्री.प्रसाद के. कुलकर्णी)
वकील

---

### जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मिळकत मोबदल्यासह कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचाही कोणत्याही प्रकारचा ताबा, कब्जा, वहिवाट, गहाण, दान, बोजा, करार, बक्षिसपत्र, भाडेपट्टा, अदलाबदल, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, खरेदीखत, कुळवहिवाट अगर अन्य कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन ०७ दिवसांचे आत नोंदवाव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणाच्याही कोणत्याही स्वरूपाच्या हरकती नाहीत असे गृहित धरून आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील.

मुदतबाहय हरकतींचा विचार केला जाणार नाही व त्या आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

**मौजे-पळू,** ता-मुरबाड, जि-ठाणे येथील खालीलप्रमाणे मिळकतीचे वर्णन

| भोगवटादाराचे नाव | सर्व्हे नं | क्षेत्रफळ (हे.आ.प्र) | पोटखरबा | आकार (रुपै) |
|---|---|---|---|---|
| श्री. महेंद्र किसने मोर व इतर | १५२/१३ | ०-१४-०० | ०-१४-०० | ०-१४ |
| | २३८ | ०-२६-३० | ०-०३-०० | ०-५५ |

**पत्ता :** शॉप नं १, ओंकार अपार्टमेंट, ॲक्सिस बँकेजवळ, विद्यानगर, मुरबाड, जि. ठाणे. मो. ९२२१६८८६२६

सही/-
**ॲड. श्री. प्रमोद गो. भोईर**
(वकील)

---

### FORM N.D.
**[See rule 92(3)]**
**Form of Notice to be published in Newspaper by the successor to the Permit holder.**

It is hereby informed for the knowledge of public that Shri **BALU NINGOJI HARER** owner of the Motor Vehicle No. MH-04-GN-4833 covered by permit No.11370/THR has expired on 08/02/2022.

I Shrimati **GEETA BALU HARER**, address: TMC SCHOOL NO.55 AZAD NAGAR, KOLSHET ROAD SANDOZ BAG THANE. being the successor to the abovementioned to confer intend to use the permit and accordingly, I have applied to the appropriate authority/ Regional Transport Office/Regional Transport Authority for the transfer of permit in my name.

Any person having any claim or objection in this regard, should within 15 days from the publication of this Notice, being such fact to the notice of Regional Transport Office/Regional Transport Authority Thane.

**Sd/-**
Name of the successor
**GEETA BALU HARER**
Address:- TMC SCHOOL NO.55 AZAD NAGAR, KOLSHET ROAD SANDOZ BAG THANE.

---

पान २ वरुन

| | |
|---|---|
| प्रस्तावाची सूचना क्रमांकः१८ | सन्मा.सदस्य श्री.सिराज महम्मद अली डोंगरे यांनी दिनांक १४.१०.२०२१ रोजीच्या पत्रान्वये लेखी स्वरुपात दिलेली प्रस्तावाची सूचना. विषय : प्रभाग क्रमांक ३० ड मधील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती योजना अंतर्गत सन २०२१-२२ मध्ये निधी उपलब्ध करुन खालील नागरी सुविधांची कामे करणे बाबत. १. प्र.क्र.३० डमधील धूम चाळीलगत पायवाट तयार करणे. २. प्र.क्र.३० ड मधील रुबी चाळी लगत पायवाट तयार करणे. ३. प्र.क्र.३० ड मधील चाँद नगर चाळीलगत पायवाट व गटर तयार करणे. ४. प्रभाग क्रमांक ३० ड मधील अजित चाळीलगत गटर व पायवाट तयार करणे. ५. प्रभाग क्रमांक ३० ड मधील ग्रीन फिल्ड चाळीलगत पायवाट तयार करणे. |
| प्रस्तावाची सूचना क्रमांकः१९ | सन्मा.सदस्य श्री.गुरमुख सिंग बि.स्यान यांनी दिनांक १८.१०.२०२१ रोजीच्या पत्राद्वारे लेखी स्वरुपात दिलेली प्रस्तावाची सूचना. १. वारलीपाडा येथील जयेंद्र त्रिभुवन यांच्या घरापासून ते शिवाजी त्रिंबके यांच्या घरापर्यंत गटार व पायवाट करणे. २. वारलीपाडा येथील बाळू चव्हाण यांच्या घरापासून ते बाळू पटेकर यांच्या घरापर्यंत गटार व पायवाट करणे. ३. वारलीपाडा येथील छोटेलाल जैस्वाल यांच्या घरापासून ते सरिता तटकरे यांच्या घरापर्यंत गटार व पायवाट करणे. ४. कैलासनगर येथील लालचंद पाल यांच्या घरापासून ते अरविंद पाल यांच्या घरापर्यंत गटार व पायवाट करणे. ५. कैलासनगर येथील रॉबिन नाडार यांच्या घरापासून ते गणेश भोईर यांच्या घरापर्यंत गटार व पायवाट करणे. |

ठामपा/पिआरओ/सचिव/७७२/२०२१-२२

दि१८.१०.२०२१

*plsvisitourofficialweb-site*
*www.thanecity.gov.in*

सही/-
(अशोक बुरपल्ले),
महानगरपालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**संरक्षित रहा, कोरोना विषाणूंपासून सुरक्षित रहा !**

'ठाणेवैभव' हे दैनिक मालक-मुद्रक-प्रकाशक मिलिन्द बल्लाळ यांनी मिड-डे इन्फोमिडिया लि., R/847/3, टी.टी.सी. इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी रबाळे, नवी मुंबई-४००७०१. महाराष्ट्र येथे छापून दामले अपार्टमेंट, टेंभीनाका, ठाणे (प) महाराष्ट्र -४००६०१ येथे प्रकाशित केले.
दूरध्वनी नं. २५३४१५२६,२५३४८५९४ Email : thanevaibhav1975@gmail.com



## 'पीएनजी ज्वेलर्स'तर्फे 'अनोखी दिवाळी' मोहीम

**ठाणे : उत्सवकाळ सुरु होत असताना आघाडीचा ज्वेलरी ब्रँड 'पीएनजी ज्वेलर्स' तर्फे 'अनोखी दिवाळी' मोहीम सुरु करण्यात आली आहे. 'अनोखी दिवाळी' मोहीम ही 7 ऑक्टोबर ते 7 नोव्हेंबर 2021 दरम्यान 'पीएनजी ज्वेलर्स'च्या सर्व स्टोअर्समध्ये सुरु असेल. दरवर्षी उत्सवकाळात 188 वर्षांची परंपरा असलेल्या 'पीएनजी ज्वेलर्स' तर्फे नाविन्यपूर्ण ग्राहककेंद्रित संकल्पना राबविल्या जातात. 'अनोखी दिवाळी' मोहीम हा त्यातीलच एक भाग आहे.**

या मोहिमेमध्ये सोने आणि हिऱ्यांच्या दागिन्यांच्या मिलाफाद्वारे एक नवीन व आकर्षक कल निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. याअंतर्गत इअररिंग्स, नेकलेसेस, पेंडंटस, बँगल्स, रिंग्स इत्यादींचे आकर्षक डिझाईन दोन्ही सोने आणि हिऱ्यांच्या दागिन्यांच्या रूपात उपलब्ध असतील. या मोहिमेअंतर्गत 'पीएनजी ज्वेलर्स' तर्फे सोन्याच्या दागिन्यांच्या घडणावळीवर 20 टक्क्यांपर्यंत तर हिऱ्यांच्या दागिन्यांच्या घडणावळीवर 100 टक्क्यांपर्यंत सूट मिळू शकते.

या मोहिमेबाबत बोलताना 'पीएनजी ज्वेलर्स'चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले की, महामारीचा आपल्या सर्वांवर झालेल्या विपरीत परिणामानंतर लोकांना आता काहीतरी सकारात्मकता हवी आहे. अनोखी दिवाळी मोहीम हा त्या दृष्टीकोनातून ग्राहकांसाठी काहीतरी नवीन आणण्याचा प्रयत्न आहे. सोने आणि हिर्यांच्या दागिन्यांचा मिलाफ हा पारंपरिक आणि समकालीन, आधुनिक शैली आणि जुन्या काळातील आकर्षकता याचे सुंदर मिश्रण आहे. आमच्या मते, हा प्रयत्न ग्राहकांच्या नक्कीच पसंतीस पडेल आणि उपलब्ध डिझाईन्सच्या अखंड श्रेणीतून ग्राहकांना या दागिन्यांच्या मिलाफाचा त्यांच्यासाठी योग्य पर्याय प्राप्त होईल.

# पाणी टंचाईला सेनाच जबाबदार

## नरेंद्र मेहता यांचा आरोप



**भाईंदर : मीरा-भाईंदर शहराला भेडसावणाऱ्या भीषण पाणी टंचाईला राज्यातील शिवसेना प्रणित महाआघाडी सरकारच सर्वस्वी जबाबदार असल्याचा आरोप करतानाच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून मिळणाऱ्या सापत्न वागणुकीच्या निषेधार्थ येत्या 21 ऑक्टोबर रोजी सिल्वर पार्क ते दहिसर चेकनाका या दरम्यान पदयात्रा आणि तद्नंतर या महामंडळाच्या कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा भाजपाचे माजी आमदार नरेंद्र मेहता यांनी दिला आहे.**

मीरा-भाईंदर शहराला प्रतिदिन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून सन 2014 पर्यंत 50 दशलक्ष लिटर्स तर स्टेम प्राधिकरणाकडून 86 दशलक्ष लिटर्स असा एकूण 136 दशलक्ष लिटर्स इतका मंजूर पाणी पुरवठा केला गेला होता. मात्र सन-2015 मध्ये माजी आमदार नरेंद्र मेहता यांच्या अथक प्रयत्नांमुळे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून 85 दशलक्ष लिटर इतक्या पाणी पुरवठ्यांत वाढ करण्यांत आली. सन-2017 पर्यंत ही वाढीव पाणी पुरवठा योजना टप्प्याटप्प्याने पुर्णत्वास आली आहे. या शहराला महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून दररोज 135 दशलक्ष लिटर्स याप्रमाणे 31 दिवसांचा 4185 दशलक्ष लिटर्स इतका पाणी पुरवठा होणे अपेक्षित आहे. मात्र या शहराला केवळ 22 दिवसांचाच कोटा पुरविला जात आहे. मागील 2 वर्षाच्या काळात या शहरातील लोकसंख्या 2 लाखाने वाढली असून राज्यासाठी शिवसेना प्रणित महाआघाडी सरकारने या शहराला 1 दशलक्ष लिटर देखील पाणी पुरवठ्यात वाढ केलेली नाही, असेही नरेंद्र मेहता यांनी सांगितले. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून 31 दिवसांच्या सरासरी ऐवजी 22 दिवसांपर्यंतचेच सरासरी पाणी मिळत आहे. त्यामुळे मिरा-भाईंदर शहराला गेल्या सहा महिन्यापासून साधारणत: दररोज 60 ते 70 दशलक्ष लिटर्स इतका कमी पाणी पुरवठा होत असून 01 ते 15 ऑक्टोंबर या दरम्यान या शहराला मंजूर पाणी पुरवठ्यापेकी 1020 दशलक्ष लिटर्स इतका कमी पाणी पुरवठा झाला असल्याची टीका मेहता यांनी केली आहे.

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून व स्टेम यांच्यामार्फत या शहराला नियमित मंजूर कोट्यानुसार पाणी पुरवठा करण्यात यावा, यासाठी राज्य शासनाच्या संबधित मंत्री महोदय तसेच शासकीय अधिकाऱ्यांसमवेत महापौर ज्योत्सना हसनाळे तसेच उपमहापौर हसमुख गहलोत यांच्या नेतृत्वाखाली सातत्याने बैठका घेण्यात आलेल्या आहेत. परंतु प्रत्येक वेळी आश्वासनाखेरीज येथील शहर वासियांना काहीही मिळालेले नाही. राज्याचे उद्योग मंत्री सुभाष देसाई आणि ठाणे जिल्ह्याचे पालक मंत्री एकनाथ शिंदे यांनी शहरवासियांच्या तोंडाला पाने पुसली आहेत. त्यामुळे कृत्रिम पाणी टंचाईला येथील शहरवासियांना सातत्याने सामोरे जावे लागत आहे, असा दावाही मेहता यांनी केला आहे.**

# इंधन दरवाढीविरोधात ठाण्यात स्वाक्षरी मोहीम




**ठाणे: पेट्रोल, डिझेल, खाद्यतेल, गॅस सिलिंडरच्या किंमतीत दिवसेंदिवस वाढ होत आहे. या दरवाढीचा निषेध करण्यासाठी गृहनिर्माण मंत्री ना. डॉ. जितेंद्र आव्हाड यांच्या सूचनेनुसार तसेच शहराध्यक्ष आनंद परांजपे यांच्या मार्गदर्शनाखाली ठाण्यात राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली.**

केंद्रातील भाजप सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे इंधन, गॅस सिलिंडरसह जीवनावश्यक वस्तूंच्या दरवाढीमुळे उसळलेल्या महागाईविरोधात राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख यांनी राज्यभरात आंदोलनाची घोषणा केली आहे. त्याचा भाग म्हणून ठाण्यातील वर्तक नगर परिसरात हे अभियान राबविण्यात आले.

एका भल्या मोठ्या बॅनरवर वर्तक नगर-भीम नगर परिसरातील नागरिकांच्या स्वाक्षऱ्या घेऊन इंधन दरवाढीचा निषेध नोंदविण्यात आला. विशेष म्हणजे, या बॅनरवर गृहनिर्माण मंत्री ना. डॉ. जितेंद्र आव्हाड यांनीदेखील सही केली.

यावेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष विक्रम खामकर, ब्लॉक अध्यक्ष संदीप वेताळ, अजय सकपाळ, ज्योती चव्हाण, वॉर्ड अध्यक्ष विजय यादव आदी उपस्थित होते.

हे अभियान सबंध शहरभर राबविण्यात येणार असून इंधन दरवाढीचा निषेध करणारे हे बॅनर शहरभर लावून नागरिकांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात येणार आहेत.

स्वाक्षऱ्या करण्यात आलेले हे बॅनर प्रधानमंत्री कार्यालयास पाठविण्यात येणार आहेत, असे यावेळी विक्रम खामकर यांनी सांगितले.

# आरपीएफ जवानाच्या प्रसंगावधानामुळे वाचले गर्भवती महिलेचे प्राण

**कल्याण : चुकीच्या मेल एक्स्प्रेसमध्ये चढल्याचे लक्षात येताच चालत्या गाडीतून उतरण्याच्या प्रयत्नात असलेली गर्भवती महिला फलाटावर पडली. फलाट आणि ट्रेनच्या मधल्या पोकळीत अडकणार इतक्यात रेल्वे स्थानकात ड्युटीवर असलेल्या आरपीएफ जवान एस. आर. खांडेकर यांनी प्रसंगावधान राखत स्वतःचा जीव धोक्यात घालून या महिलेला बाहेर खेचले. स्वतःचा जीव धोक्यात घालून आरपीएफ जवनाने महिलेला सुरक्षीत वाचवल्याबद्दल त्यांचे कौतुक होत आहे.**



ही घटना सोमवारी 18 ऑक्टोबर रोजी पहाटे 6 वाजण्याच्या सुमारास कल्याण रेल्वे स्थानकातील 4 नंबर फलाटावर घडली. चंद्रेश नावाचा प्रवासी आपला छोटा मुलगा आणि 8 महिन्याच्या गर्भवती पत्नीसमवेत गोरखपूर एक्स्प्रेसची प्रतीक्षा करत कल्याण स्थानकातील फलाट क्रमांक 4 वर थांबला होता. या दरम्यान स्थानकात दुसरी मेल सिग्नल नसल्याने थांबविण्यात आली होती. मात्र चंद्रेशला ती गोरखपूर एक्स्प्रेस असल्याचा समज झाल्याने तो आपल्या कुटुंबासह त्या गाडीत चढला. मात्र ही गोरखपूर एक्स्प्रेस नसल्याचे लक्षात येताच त्याने गाडीतून उतरण्याचा प्रयत्न केला तोपर्यंत गाडी सुरु झाली होती.

चंद्रेश गाडीतून उतरला मात्र गाडीतून उतरण्याचा प्रयत्नांत त्याची आठ महिन्याची गर्भवती पत्नी फलाटावर पडली आणि मेल आणि फलाटाच्या मधल्या पोकळीत घसरली. ती गाडी खाली जात असल्याचे पाहून फलाटावर ड्युटीवर तैनात असलेल्या आरपीएफ जवान खांडेकर यांनी तत्काळ धाव घेत तिला फलाटावर खेचून घेत तिचा जीव वाचवला. खांडेकर यांनी प्रसंगावधान दाखवत एकाच वेळी दोन जीव वाचवल्याबद्दल त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# शाळेच्या मालकी वादातून प्राणघातक हल्ल्याचा प्रयत्न

## शाळेच्या कर्मचाऱ्यानेच दिली हल्ल्याची सुपारी



**कल्याण: शाळेच्या मालकीच्या वादातून संस्थाचालकामध्ये वाद सुरु होता. हा वाद इतक्या विकोपाला गेला की या वादातून चक्क सुपारी दिली गेली. संस्थेच्या पदाधिकाऱ्यावर प्राणघातक हल्ला करण्याचा प्रयत्न करण्यात आला. पोलीस तपासात शाळेच्या कर्मचाऱ्याने ही सुपारी दिल्याचे उघड झाले आहे.**

सीसीटीव्हीच्या सहाय्याने कल्याणच्या खडकपाडा पोलिसांनी दोन आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. या प्रकरणात आणखी किती जणांचा सहभाग आहे याचा शोध पोलीस घेत आहेत. या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे.

कल्याण पूर्व भागातील काटेमानिवली परिसरात साई इंग्लीश स्कूल ही नामांकीत शाळा आहे. या शाळेच्या मालकी हक्कावरुन शाळेचे प्रशासक गिरी सोमयाजुला यांचा काही सदस्यांसोबत वाद सुरु आहे. हे प्रकरण न्याय प्रविष्ट आहे. 14 ऑक्टोबर रोजी गिरी आपल्या पत्नी आणि दोन मुलांसोबत स्वत:च्या गाडीने कल्याण पश्चिमेतून कल्याण पूर्व भागातील शाळेकडे निघाले होते. एका ठिकाणी रस्त्यावर काही अज्ञात इसमानी त्यांची गाडी अडविण्याचा प्रयत्न केला. या अज्ञात इसमाचा हातात रॉड आणि कोयता होता. हे अज्ञात तरुण आपल्यावर हल्ला करण्याचा तयारीत असल्याचे त्यांच्या लक्षात आले.

स्कूटी चालकाने त्याची स्कूटी गिरी यांच्या गाडीसमोर आणून उभी केली. गिरी यांनी गाडी न थांबविता स्कूटी फरफटत नेले. त्याच्यामागे चार ते पाच हल्लेखोर होते. ही घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे. याबाबत कल्याणच्या खडकापाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अप्पर पोलीस आयुक्त दत्तात्रय कराळे, पोलीस उपायुक्त सचिन गुंजाळ, सहाय्यक पोलीस आयुक्त उमेश माने पाटील यांच्या मागदर्शनाखाली खडकपाडा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक अशोक पवार आणि पोलीस निरीक्षक शरद झीने यांनी तपास सुरु केला आहे.

पोलिसांनी सीसीटीव्हीच्या सहय्याने या प्रकरणाचा छडा लावला. पोलिसांनी या प्रकरणी दोन आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. जयेश अंकूश आणि राहूल खुळे अशी दोन आरोपींची नावे आहेत. धक्कादायक म्हणजे जयेश हा साई स्कूल शाळेत काम करतो. आरोपी जयेशने गिरी यांच्यावर हल्ला करण्यासाठी हल्लेखोरांना 1 लाखाची सुपारी दिल्याचे तपासात उघड झाले आहे. फरार हल्लेखोरांचा शोध पोलीस घेत आहेत. या प्रकरणात जयेश, अंकुशसह आणखी किती जणांचा सहभाग आहे याचा तपास पोलीस घेत आहेत.

# गुरुकृपा विकास संस्थेमार्फत जागतिक बेघर दिन साजरा

**ठाणे: कल्याण-डोंबिवली महानगरपालिका अंतर्गत दीनदयाळ अंत्योदय योजना, राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत गुरुकृपा विकास संस्था संचालित सावली बेघर निवार केंद्र डोंबिवली पूर्व येथे 10 ऑक्टोबर रोजी जागतिक बेघर दिन साजरा करण्यात आला.**



त्यावेळी संस्थेच्या वतीने सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात स्वप्नील शिरसाठ यांच्या मार्फत विविध गीतांचे आयोजन करण्यात आले. त्याचबरोबर बेघर लोकांसाठी आरोग्य तपासणी शिबिर व डेंटल तपासणी करण्यात आली.

केक कापून बेघर व्यक्तींना नाश्ता देण्यात आला. तसेच संस्थेमार्फत घेण्यात विविध स्पर्धेत विजेते झालेले तीन क्रमांकाच्या स्पर्धकांना बक्षिस वितरीत करण्यात आले. निवारा केंद्रातील बेघर व्यक्तिना कोविड-19 लसिकरणाचे सर्टिफिकेट देण्यात आले.

त्यावेळी स्थानिक नगरसेवक राजन मराठे, डॉ. घोरपडे, डॉ. ललित पाटील, डॉ.महादेव गोपाळ, ज्योत्स्ना दोशी, भागवत पठारे, महाडिक, जगदीश पवार, एकनाथ कदम, राणी गोसावी यांनी विशेष सहकार्य केले.




